## सपा अध्यक्ष अखिलेश यादवांच्या सभेत पुन्हा गोंधळ



**आझमगड :** जिल्ह्यातील लालगंज लोकसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे उमेदवार प्रसाद सरोज यांच्या समर्थनासाठी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव प्रचाराला आले होते, मात्र त्यांच्या सभेत पुन्हा गदारोळ उडाला. सभेतच दगडफेक आणि एकमेकांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. या गोंधळात अनेकजण जखमी झाल्याची माहिती आहे. व्यासपीठावर अखिलेश यादव पोहचले तेव्हा कार्यकर्त्यांची गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. त्यामुळे कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्स तोडून अखिलेश यादव यांच्या दिशेने धावत आले. कार्यकर्त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्जही केला. या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यात व्यासपीठाच्या दिशेने धावताना कार्यकर्ते एकमेकांना ढकलत आहेत. नियंत्रणाबाहेर गेलेल्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३०४
www.ramprahar.com

बुधवार, २२ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


आंबेनळी घाटात पावसाळी भूस्खलनाचा वाढता धोका/५

विमानाच्या धडकेत तब्बल ४० फ्लेमिंगोंचा मृत्यू/६

सुपर लीग क्रिकेट स्पर्धेसाठी रायगडच्या तीन मुलींची निवड/८


# बारावीच्या परीक्षेत कोकणच अव्वल

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि. २१) जाहीर करण्यात आला. यंदा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला असून कोकण विभागाने यशाची परंपरा कायम राखत सर्वाधिक ९७.५१ टक्के निकालाची नोंद केली आहे. त्याचप्रमाणे राज्यात मुलींनी बाजी मारली आहे.

यंदा राज्यातील १४ लाख ३३ हजार ३७१ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १४ लाख २३ हजार ९७० विद्यार्थी या परीक्षेकरिता प्रविष्ट झाले होते. यातील १३ लाख २९ हजार ६८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या निकालात २.१२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २६ विषयांचा निकाल हा १०० टक्के लागला आहे.

## यंदाही मुलींची बाजी



यंदाही बारावीच्या निकालामध्ये मुलांपेक्षा मुली अग्रेसर आहेत. ९५.४४ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत, तर उत्तीर्ण होणाऱ्या मुलांचे प्रमाण ९१.६० टक्के आहे. म्हणजे परीक्षा देणाऱ्या मुलांपेक्षा ३.८४ टक्के अधिक मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

### विभागनिहाय टक्केवारी

- कोकण : ९७.५१
- नाशिक : ९४.७१
- कोल्हापूर : ९४.२४
- छत्रपती संभाजीनगर : ९४.०८
- पुणे : ९४.४४
- अमरावती : ९३
- लातूर : ९२.३६
- नागपूर : ९२.१२
- मुंबई : ९१.९५
- एकूण : ९३.३७ टक्के

### रायगड जिल्ह्याचा निकाल ९४.८३ टक्के

रायगड जिल्हा हा मुंबई विभागात यंदाही उच्च माध्यमिक बारावीच्या परीक्षेत अव्वल ठरला आहे. रायगड विभागाचा निकाल हा ९४.८३ टक्के लागला आहे. जिल्ह्यात ९२.७१ टक्के मुले तर ९७.०१ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. १३ हजार ७७८ मुले तर १४ हजार ५३ मुली असे एकूण २७ हजार ८३१ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. **(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

### १०० टक्के गुण मिळवत तनिशा राज्यात पहिली

छत्रपती संभाजीनगरमधील वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी तनिशा सागर बोरामणीकर हिला १०० टक्के गुण मिळाले आहेत. अशी धवल कामगिरी करणारी ही राज्यातील एकमेव विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीला प्रत्यक्ष परीक्षेत ५८२ आणि क्रीडा गुण १८ असे एकूण ६०० पैकी ६०० गुण मिळाले आहेत.

# लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेज, टीएनजी कॉलेजचा १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२४मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजने आपल्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत १०० टक्के यश संपादन केले आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये सायन्स विभागामध्ये सिद्धी कुलकर्णी हिने ८३.८३ टक्के तर कॉमर्स विभागात ८८.८३ टक्के गुण प्राप्त करून निया चव्हाण हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या सायन्स विभागातून बारावीच्या परिक्षेसाठी एकूण ७६ विद्यार्थी बसले होते. ते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सायन्स शाखेतून ८३.८३ टक्के गुण मिळवून सिद्धी कुलकर्णी प्रथम, अस्मिता देवकर ८३.५० टक्के द्वितीय आणि स्मृती पात्रोने ८२.१७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. पाच विद्यार्थी ७५ टक्केपेक्षा जास्त तर ६० विद्यार्थी ग्रेड १ आणि ११ विद्यार्थी ग्रेड २ कॅटेगरीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

कॉमर्स शाखेतून नीया चव्हाणने ८८.८३ टक्के मिळवून प्रथम, राहुल म्हात्रेने ८२.३३ मिळवून द्वितीय आणि स्मिता शर्माने ७९.६७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला आहे, तसेच नऊ विद्यार्थी ७५ टक्केपेक्षा जास्त तर ४३ विद्यार्थी ग्रेड १ आणि २७ विद्यार्थी ग्रेड २ कॅटेगरीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व निकालात मुलींनी बाजी मारली आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत १२वीच्या परीक्षेच्या निकालात शाळेचा निकाल १०० टक्के लावला आहे. ७५ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. ते सर्वच्या सर्व ७५ विद्यार्थी विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यामध्ये नायला कुंडलिक हिने ७७.८३ टक्के मिळवत प्रथम, फैसल सागवेकर ७७ टक्के मिळवत द्वितीय आणि तनीश म्हात्रे याने ७६.१७ टक्के मिळवत तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला. तीन विद्यार्थी ७५ टक्के, २६ विद्यार्थी ग्रेड १ तर तर ४६ विद्यार्थी ग्रेट २ कॅटेगरीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, मुख्याध्यापिका प्रणीता गोळे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.

### लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजचे यशस्वी विद्यार्थी



सिद्धी कुलकर्णी
८३.८३% (सायन्स)



अस्मिता दिवेकर
८३.५०% (सायन्स)



स्मृती पात्रो
८२.१७% (सायन्स)



निया चव्हाण
८८.८३% (कॉमर्स)



राहुल म्हात्रे
८२.३३% (कॉमर्स)



स्मिता शर्मा
७९.६७% (कॉमर्स)

## देशातील जनताच माझी उत्तराधिकारी –पंतप्रधान नरेंद्र मोदी



**बिहार : वृत्तसंस्था**

देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरू आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर दोन महिन्यांनी मोदी पंतप्रधानपदाचा राजीनामा देतील आणि अमित शाह पंतप्रधान होतील. या विधानानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजकीय उत्तराधिकारी कोण? असा प्रश्न विचारला जात होता. यावर पंतप्रधान मोदी यांनीच भाष्य विरोधकांना उत्तर दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि.२१) बिहारमधील महाराजगंज येथील एका सभेला संबोधित करताना देशातील जनताच आपली उत्तराधिकारी असल्याचे म्हटले आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, या देशातील जनताच माझी उत्तराधिकारी आहे. देशातील जनतेने हे सर्व पाहिले आहे, असे ते म्हणाले.

## निवडक

### किल्ले रायगडावरील पायवाट बंद करण्याचे आदेश जारी

**रायगड :** रायगड किल्ल्यावर



महादरवाजाच्या खालील बाजूस असलेल्या उंच कड्यावरील मोकळे दगड काढण्याचे काम २३ व २४ रोजी करण्यात येणार आहे. याकरिता पायवाट बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत. पर्यटक, स्थानिक पायवाटेने गड चढ-उतार होणार नाहीत याबाबत स्थानिक प्रशासनाने दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

### नाशिकच्या इगतपुरीत पाच जणांचा बुडून मृत्यू

**नाशिक :** इगतपुरी येथील भावली धरणात बुडून पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन तरुण व तीन तरुणींचा समावेश आहे. हे सर्वजण धरणावर फिरण्यासाठी आले होते. धरणात पोहोण्यासाठी गेले असताना ही दुर्घटना घडली. आदिवासी बांधवांच्या मदतीने सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

### पुण्यातील कार अपघात प्रकरण

## अल्पवयीन आरोपीच्या वडिलांसह बारमालक, मॅनेजरला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणी नगर जंक्शन भागात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्श कारने मोटरसायकलला धडक दिली होती. या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आता पुणे पोलिसांनी अल्पवयीन आरोपीच्या वडिलांसह बारमालक आणि मॅनेजरला अटक केली आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, या प्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने सोमवारी त्याच्या वडिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता, मात्र तेव्हापासून ते फरार होते. पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू होता. यादरम्यान मंगळवारी (दि.२१) पहाटे त्यांना छत्रपती संभाजीनगर भागातून अटक करण्यात आली. याशिवाय बारमालक आणि मॅनेजरलाही अटक करण्यात आली. आरोपी १७ वर्षांचा अल्पवयीन असतानाही त्यांनी त्याला मद्य दिले, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.





रविवारी पहाटे झालेल्या या अपघातानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्याला विशेष हॉलिडे कोर्टात हजर केले होते. त्याची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात यावी तसेच आरोपी साडेसतरा वर्षांचा असल्याने त्याला प्रौढ समजून खटला चालवला जावा, अशी मागणी करण्यात आली होती, मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत आरोपीला जामीन मंजूर केला होता, तसेच अपघातावर ३०० शब्दांचा निबंध लिहावा, असे आदेश दिले होते.

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली बैठक

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी पुण्यात पोहचून पोलीस आयुक्तालयाला भेट दिली आणि पोलिसांसह बैठक घेतली. आत्तापर्यंत जे घडले त्याचा आढावा घेतला, तसेच त्यांनी पुढील कारवाईचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणात कुणाचीही गय करू नका, असेही आदेश त्यांनी दिले. **(सविस्तर पान २ वर..)**

> आरोपीने मद्यप्राशन केले होते. दोन्ही सीसीटीव्ही फुटेज मिळाले आहेत. त्यांनी ऑनलाईन पेमेंट केले आहे. ही दारूची ऑनलाईन पेमेंट आहेत, परंतु रक्ताचा अहवाल आल्यानंतरच याचा खुलासा होईल.
>
> **–अमितेश कुमार, पोलीस आयुक्त**

## खंडाळा घाटात कंटेनर कारवर कोसळून दोघांचा मृत्यू

### सहा जण जखमी; तीन लहान मुलांचा समावेश

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खंडाळा घाटात बॅटरी हिलजवळ एक कंटेनर कारवर कोसळून सोमवारी (दि. २०) रात्री १०च्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये तीन लहान मुलांचा समावेश असून त्यात एक दीड वर्षाचा मुलगा आहे.

लोणावळ्याकडून मुंबई-पुणे महामार्गाने मुंबईकडे जात असताना वाघजाई मंदिराच्या पुढे बॅटरी हिल परिसरात या रस्त्याला तीव्र उतार आणि वळण आहे. याच ठिकाणी सोमवारी रात्री मुंबईच्या दिशेने जाणारा कंटेनर (एमएच १४ एफटी १४४५) समोरून येणाऱ्या कारवर (एमएच १४ बीएक्स १६०५) उलटला. प्राथमिक माहितीनुसार, ही कार अलिबागवरून तळेगावला निघाली होती. या कारमधून चौधरी कुटुंबातील



आठ जण प्रवास करीत होते.

अपघातात कविता दत्तात्रय चौधरी आणि दत्तात्रय चौधरी (दोन्ही रा. तळेगाव) यांचा जागीच मृत्यू झाला, तर योगेश चौधरी (वय ४०), जान्हवी योगेश चौधरी (वय ३१), दिपांशा योगेश चौधरी (वय ९), जिगिशा योगेश चौधरी (वय १.५), मितांश दत्तात्रेय चौधरी (वय ९) आणि भूमिका दत्तात्रेय चौधरी (वय १६) हे सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


## राज्यातील मुलींना आता उच्च शिक्षण मोफत

### ६४२ कोर्सेसचा समावेश; २० लाख मुलींना होणार फायदा

**सोलापूर : प्रतिनिधी**

बारावीनंतर उच्चशिक्षण घेणाऱ्या राज्यभरातील २० लाख मुलींना शासनाच्या माध्यमातून आता मोफत शिक्षण मिळणार आहे. त्यात अभियांत्रिकी, मेडिकल, फार्मसीसह तब्बल ६४२ कोर्सेसचा समावेश असून त्यासाठी राज्य शासन दरवर्षी १८०० कोटी रुपयांचा भार उचलणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी याच शैक्षणिक वर्षापासून (२०२४-२५) होणार आहे.

बारावीनंतर कुटुंबाच्या आर्थिक अडचणींमुळे अनेक मुलींना मधूनच शाळा सोडून द्यावी लागते, मात्र आता त्यावर राज्य सरकारने मार्ग शोधला असून उच्चशिक्षणातील तब्बल ६४२ कोर्सेसचे शुल्क



शासनातर्फेच भरले जाणार आहे. राज्यभरातील २० लाख मुलींचा १८०० कोटी रुपये खर्च राज्य शासन करणार आहे.

मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी वाढावी, उच्चशिक्षणाचा खर्च परवडत नाही म्हणून बालविवाह लावून देण्याचा प्रकार थांबणार आहे. विद्यापीठाशी संलग्नित उच्च महाविद्यालयांमधील तब्बल २० लाख मुलींसाठी हा निर्णय ऐतिहासिक ठरणार आहे.

### कॅबिनेटमध्ये होणार अंतिम निर्णय

राज्यातील उच्चशिक्षण घेणाऱ्या जवळपास २० लाख मुलींना ६४२ कोर्सेस पूर्णपणे मोफत शिकण्याची संधी मिळणार आहे. या कोर्सेसची अर्धी फी सध्या शासनाच्या माध्यमातून भरली जाते, पण आता संपूर्ण शुल्क राज्य शासनच भरणार आहे. त्यासंबंधीचा निर्णय यापूर्वीच मंत्रिमंडळाच्या उपसमितीत झाला आहे. आता कॅबिनेटमध्ये त्यावर अंतिम निर्णय होणार असून लोकसभेची आचारसंहिता संपल्यानंतर पहिल्याच कॅबिनेटमध्ये हा निर्णय होणार आहे.

## मतदानाच्या तक्रारींबाबत मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील पाचव्या टप्प्यात मतदानाची टक्केवारी घटली. त्यामागे मतदान प्रक्रियेतील संथपणा कारणीभूत होता का? याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे मुख्य सचिवांना दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मतदान प्रक्रियेदरम्यान आलेल्या अनेक तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे.



मुंबईमध्ये मतदानावेळी वृद्ध मतदारांना रांगेचा आणि कडक उन्हाचा झालेला त्रास त्यामुळे मतदानावर झालेला परिणाम यांची सविस्तर चौकशीचे करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्य सचिव करीर यांना आदेश दिले आहेत.

सोमवारी राज्यातील एकूण १३ लोकसभा मतदारसंघामध्ये मतदान झाले. मुंबईतील सहा मतदारसंघातील मतदान केंद्रांवर गोंधळ झाल्याचे पहायला मिळाले, कारण अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड झाला होता, तसेच संथ गतीने रांग पुढे जात होती. याची दखल सरकारकडून घेण्यात आली आहे.

अनेक मतदारांना तासन्तास रांगेमध्ये उभे रहावे लागले. त्यामुळे मतदानासाठी आलेल्या लोकांना मनस्ताप सहन करावा लागला. शिवाय मतदान केंद्रामध्ये पुरेशा मूलभूत सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आल्या नव्हत्या. अनेक ठिकाणी वृद्धांसाठी विशेष व्यवस्था नव्हती. त्यामुळे मतदारांना त्रासाला सामोरे जावे लागले.

## तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर पोलादपूरला तुफानी पाऊस

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तीन दिवसांची विश्रांती घेतल्यानंतर आता पुन्हा पोलादपुरात मंगळवारी सायंकाळी तुफानी पाऊस सुरू झाला. वादळामुळे झाड कोसळून घरांचे अंशत: नुकसान झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या पावसामुळे महावितरणच्या विद्युतवाहिनी तारा तुटल्याने वीजप्रवाह खंडीत झाला, तर अनेक ठिकाणी घरांची कौले उडून गेली.

पोलादपूर तालुक्यात तीन दिवस पावसाने हजेरी लावल्यानंतर आंबा बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान केले. त्यानंतर सलग तीन दिवस विश्रांती घेतल्याने पोलादपूरकरांनी सुस्कारा सोडला, परंतु अवकाळीने पोलादपूरमध्ये मंगळवारी सायंकाळी पुन्हा हजेरी लावली आणि शहरातील पिंपळपार ते



फौलादजंग दरम्यानच्या रस्त्यावर एक झाड कोसळले. सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कर्मचारी वसाहतीवर महाकाय वृक्ष कोसळून सरकारी खोल्यांचे नुकसान झाले. सुदैवाने तेथील कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय बचावले, तर चरई येथील एका कुटुंबाच्या घराचे छप्पर वाऱ्याने उडाल्याने नुकसान झाले आहे.

महावितरणकडून मान्सूनपूर्व कामांची सुरुवात झाली असतानाच अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे ग्रामीण भागात विजवाहक तारा तुटून तसेच विजेचे खांब वाकून विद्युतपुरवठा बंद झाला.

महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी या बिघाडावर तातडीने काम सुरू करून २४ तासांच्या कालावधीत विद्युतपुरवठा सुरळीत करण्यात यश मिळविले.

# पनवेल, उरण परिसरातील बारावीच्या विद्यार्थ्यांचे धवल यश

## सीकेटी जुनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल ९९.३९ टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी (फेब्रु/मार्च २०२४) बोर्ड परीक्षेचा एकूण निकाल ९९.३९ टक्के लागला आहे.

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून बोर्ड परीक्षेस एकूण १३१२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यातून १३०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ९८.२६ टक्के लागला असून कला शाखेतून ११५ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यातून ११३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतून प्रचिती योगेश लबडे हि विद्यार्थिनी ८२.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, परिणीता प्रमोद धुरी ही विद्यार्थिनी ८१.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर अश्विनी रवी बांगरी या विद्यार्थिनीने ७६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

वाणिज्य शाखेचा निकाल ९९.५१ टक्के लागला असून वाणिज्य शाखेतून ४१४ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यातून ४१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेतून यश अजित देसाई हा विद्यार्थी ९२.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, श्रेया संतोष घरत ही विद्यार्थिनी ९०.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर प्राची ज्ञानेश्वर पाटील या विद्यार्थिनीने ८९.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विज्ञान शाखेचा निकाल ९९.४८ टक्के लागला असून विज्ञान शाखेतून ७८३ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यातून ७७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून आरती मोहनलाल गुप्ता ही विद्यार्थीनी ८९.५० टक्के गुण मिळवून प्रथम, धनराज सुधीर मोरे हा विद्यार्थी ८८.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर आशिष पप्पू गुप्ता या विद्यार्थ्याने ८७.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

एचएससी बोर्ड परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


आरती गुप्ता ८९.५० %


धनराज मोरे ८८.५० %


आशिष गुप्ता ८७.६७ %


यश देसाई ९२.६७%


श्रेया घरत ९०.३३ %


प्राची पाटील ८९.३३ %


प्रचिती लबडे ८२.१७ %


परिनीता धुरी ८१.५० %


अश्विनी बांगरी ७६.८३ %

## गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे बारावीमध्ये सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी – मार्च २०२४मध्ये झालेल्या एच.एस.सी.अर्थात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९५.५८ टक्के एवढा लागला आहे. वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९३.८१ टक्के लागला आहे.

विद्यालयामधील कला व वाणिज्य दोन्ही शाखेत मिळून १३८ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बोर्ड परीक्षेस नामनिर्देशनपत्र भरलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थी परीक्षेस गैरहजर राहिले तर सहा विद्यार्थी आनुत्तीर्ण झाले. तर १३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले, मात्र वाणिज्य शाखेच्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून वाणिज्य शाखेतून एकूण ३९ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ठ झोले व सर्वजण उत्तीर्ण झाले.

विद्यालयाचा कला शाखेतून परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या ९९ विद्यार्थ्यांपैकी ९१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन कला शाखेचा निकाल ९३.८१ टक्के एवढा लागला. वाणिज्य शाखेच्या रूपाली वैजिनाथ मंजुळकर हिने ८५.६७ टक्के एवढे गुण प्राप्त करून विद्यालयामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. तर कला शाखेच्या कुमारी नमिता शशिकांत घरत हिने ८०.६७ टक्के एवढे गुण प्राप्त करून विद्यालयामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. वाणिज्य शाखेच्या कुमारी वैदेही ऋषी कोळी हिने ७९.३३ टक्के एवढे गुण प्राप्त करून विद्यालयामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी आणि गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाला मार्गदर्शन करणारे विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे व अध्यापन करणारे ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे यांचेसह राजेंद्र चौधरी, माणिक घरत, राजू खेडकर, उमेश पाटील, जयवंती ठाकूर व अर्चना पाटील यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

### वाणिज्य शाखा

*प्रथम रूपाली वैजिनाथ मंजुळकर ८५.६७ %*
*द्वितीय वैदेही ऋषी कोळी ७९.३३ %*
*तृतीय रिंकिता लक्ष्मण हुंबे ७९.०० %*

### कला शाखा

*प्रथम नमिता शशीकांत घरत ८०.६७ %*
*द्वितीय अश्विनी विलास रायभोळे ७३.३१ %*
*तृतीय हेमांगी प्रभाकर कोळी ७०.१७ %*

## जासई हायस्कूलचे बारावीमध्ये यश



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई ता. उरण जि. रायगड या विद्यालयाचा इयत्ता बारावी सायन्सचा निकाल १०० टक्के व आर्ट्सचा निकाल ८५ टक्के लागला आहे.

विद्यालयाच्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील, महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, लेखनिक डी. के पाटील, एस. एम. ठाकूर आदींनी अभिनंदन केले.

## उरणमधून बारावीच्या परीक्षेत १९१४ विद्यार्थी उत्तीर्ण

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील उच्च माध्यमिक विद्यालय बारावीच्या मंडळाने मंगळवारी (दि. २१) घोषित करण्यात आलेल्या निकालात एकूण १३ उच्च माध्यमिक विद्यालयातून दोन हजार ५३ विद्यार्थी विद्यार्थीनी परीक्षेत बसले होते. त्यापैकी एक हजार ९१४ विज्ञान, वाणिज्य, कला शाखेतील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ही टक्केवारी ९३.२२ टक्के इतकी आहे.

खास करून यावर्षी उरण तालुक्यातील विज्ञान शाखेतून परीक्षेसाठी बसलेल्या सर्वच्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. मागील अनेक दिवसांपासून पालक आणि विद्यार्थ्यांना १२ वीच्या निकालाची प्रतिक्षा होती. बारावीचा निकाल काल अखेरीस मंगळवारी दुपारी १ वाजता जाहीर झाला. उरण तालुक्यात एकूण १३ उच्च माध्यमिक विद्यालय आहेत.

चार उरण शहरात तर उर्वरित नऊ विद्यालये ही ग्रामीण भागात आहेत, मात्र या विद्यालयाचा निकाल सद्या सुधारू लागला आहे. यावर्षी तर विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ही एक लक्ष वेधनारी घटना आहे. उरण तालुक्यातील निकालाची माहिती उरण पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी प्रियांका पाटील यांनी दिली आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तालुक्यातून कौतूक होत आहे.

## निवडक

### अल्पवयीन मुलीचे अपहरण




**पनवेल :** एका अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने राहत्या घरातून अज्ञात कारणासाठी फुस लावून संमतीशिवाय पळवून नेल्याची घटना तालुक्यातील पेंधर गावात घडली आहे. रुबीकुमारी मुखिया असे या मुलीचे नाव असून रंग गोरा, उंची चार फुट सहा इंच, केस काळे लांब, कानात बाजारु रिंग असून अंगात लाल रंगाची सलवार व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. तसेच तिला हिंदी व मैथिली भाषा अवगत आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक सुनील घरत यांच्याशी संपर्क साधावा.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याचा नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करीत आहेत. शहरातील डोंबाळे कॉलेज रोड जाणाऱ्या रस्त्याच्या रेल्वे फाटकाच्या मागे क्रिष्ण सॉलिटीयर्स बिल्डींगच्या कंपाऊंडच्या बाजूला एका ६० ते ६५ वयोगटातील व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दांड-रसायनी रस्त्यावर डागडुजी करण्याची मागणी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड रसायनी रस्त्यावरील पराडे कॉर्नर, मोहोपाडा प्रवेशव्दार ते एमएसीबी कार्यालय, रीस येथील डॉ. बाबासाहेब आबेडकर भवनासमोर, टी. सी. आय. गोडाऊन जवळ रस्त्याची दुरावस्था झाल्याने वाहन चालविणे दिव्यच होवून बसले आहे. या रस्त्यावरील खड्डे चुकविताना अपघातांना आमंत्रण मिळत आहे. त्यामुळे डागडुजी करण्याची मागणी प्रवाश्यांकडून होत आहे.

रसायनी पाताळगंगा या औद्योगिक क्षेत्राला जोडणारा दांड- रसायनी हा मुख्य रस्ता आहे. परिसरातील वाढती लोकसंख्या, रोजची रहदारी औद्योगिक क्षेत्राकडे जाण्या-येणाऱ्या वाहनांची वर्दळ पाहता दांड-रसायनी रस्ता नादुरूस्त असल्याने किरकोळ अपघातांना आमंत्रण मिळत आहे. नागरिकांना तसेच वाहन चालकांना खड्डे चुकविताना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

या रस्त्यावरील रिस, मोहोपाडा, वावेघर या तीन किमीचा रस्ता समस्याग्रस्त असल्याने वाहनचालकांना वाहन चालविताना खड्यातून प्रवास करावा लागत आहे. यामुळे किरकोळ अपघातांसह अनेकांना कंबरदुखी, पाठदुखीचा त्रास जाणवत आहे.

## दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने मुख्यालयात शपथ



**पनवेल : वार्ताहर**

माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधींच्या स्मृतींना वंदन करून पनवेल महापालिकेच्या मुखयालयात मंगळवारी (दि. २१) दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने शपथ घेण्यात आली.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त मारुती गायकवाड, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, उप अभियंता सुधीर साळुंखे, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवीन पनवेल येथे अत्रे कट्ट्यातर्फे व्याख्यान




**पनवेल : वार्ताहर**

समाजात स्व:नामाचा जप देणाऱ्या स्वयंभू गुरुचीं प्रथा आली आहे पण ते खर्या अर्थाने खरे गुरू नाहीत असे प्रतिपादन डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी, नवीन पनवेल येथे अत्रे कट्ट्यातर्फे गुरु कसा असावा या विषयावरील व्याख्यानाच्यावेळी केले.

यापुढे बोलताना म्हणाले, ब्रम्हाचे ज्ञान देणारे ते गुरू म्हणून गरुर्साक्षात परब्रह्म असे आपण म्हणतो. गुरूच्या चांगल्या वागण्यातून संस्कारित झालेला शिष्यच अधिकारी बनतो. गुरु हा मोक्षाचा पथदर्शक असतो हे खरे असले तरी परंपरा असलेलाच खरा गुरू असतो. आज मोक्षा करता गुरू कोणालाच नको असतो. प्रापंचिक अडचणी सोडविण्यासाठी गुरू आहे. दासबोध, मनोबोध, ज्ञानेश्वरी, मनाचे श्लोक असे ग्रंथ म्हातारपणी वाचायचे असतात. तीर्थयात्रा देखील म्हातारपणीच करायच्या असतात ही चुकीची प्रथा असून तरुणपणातच हे वाचन करून तीर्थाटन देखील तरुणपणातच करावे असा सल्ला त्यांनी दिला.

आपल्या व्याख्यानात त्यांनी, धर्म,श्रद्धा, अंधश्रद्धा, विश्वास, मराठीत आजकाल वापरले जाणारे चुकीचे शब्द यांचादेखील उहापोह डॉ. शेवडे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत अत्रे कट्ट्याचे अरविंद करपे यांनी केले.

## मोहोपाड्यात शहरीकरणाला वेग



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

परिसराचा केंद्रबिंदू व सुसज्ञ बाजारपेठ असलेल्या मोहोपाड्याचे शहरीकरण फार झपाट्याने होत आहे. त्यामुळे मोहोपाड्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

रसायनीतील वाढलेली लोकसंख्या आणि मोहोपाडातील वाढते शहरीकरण यामुळे परिसरातील जागेच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. म्हणूनच नवी मुंबईपासून तासाभराच्या अंतरावर असलेली रसायनी सर्वांना सोयीची व सुखद वाटत आहे. रसायनी पाताळगंगा हे औद्योगिक क्षेत्र असल्याने रोजीरोटीसाठी, कामधंद्यासाठी येणाऱ्या चाकरमान्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी वावेघर पोस्ट कार्यालयातून पत्रव्यवहाराचा कारभार चालायचा. सन २००० नंतर रसायनी पोस्टाची स्वतःची इमारत होऊन कामकाज सुरू झाले.

परिसरात भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, सिंडीकेट बँक, कॅनरा बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, रायगड डिस्ट्रिक्ट बँक, महाड को. ऑफरेटीव्ह बँक आदी सुरू आहेत. परिसरात अनेक कंपन्यांच्या वसाहती, हिरानंदानी प्रकल्प यामुळे रसायनी भारदस्त व बहुमजली इमारतींनी फुलू लागली आहे. मोहोपाडा शहरालगत एमआयडीसी वसाहत, सिप्ला वसाहत, रिलायन्स वसाहत, बकुळ, अल्कली, बॉम्बे डाइंग वसाहत आहेत. तसेच रिस ते मोहोपाडा रस्त्यालगत असणाऱ्या वसाहती संकुल लक्ष वेधून घेत आहेत.

रसायनी ही पुण्यनगरी आहे. या परिसराला अनेक संतमहात्म्यांनी भेट दिल्याचे ज्येष्ठ मंडळी सांगत आहेत. काही अंतरावरच कर्नाळा हा फार जुना व ऐतिहासिक किल्ला आहे. स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात शिरढोण गावातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनी केली. सन १९८० मध्ये मोहोपाडा येथील चिमाजी जानू खराडे यांचे राज्यात कुस्ती पैलवान म्हणून नाव होते. राज्यात कुस्ती आखाड्यात कौशल्य दाखवून त्यांनी राज्यात रसायनीची ओळख निर्माण केली. त्यांना परिसरात चिमा पैलवान म्हणून ओळखत.

रसायनीत औद्योगिकीकरण व शहरीकरण झपाट्याने होत आहे. त्यामुळे रसायनीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. रसायनीतील पूर्वीची मातीची, कुडांची घरे गेली. त्याजागी बंगले, सोसायट्या उभ्या राहिल्या. आतातर टॉवर्स उभे राहत आहेत. काळाच्या ओघात आजची रसायनी सुधारलेली असली तरी उद्याची रसायनीत गगनचुंबी इमारतींची असेल.

## संपादकीय

# बडे बाप के बेटे

पुण्यात रविवारी रात्री अडीचच्या सुमारास घडलेल्या व दोघांचा बळी घेणाऱ्या मोटार दुर्घटनेमुळे एकंदरच राज्यात प्रचंड संतापाची प्रतिक्रिया उमटली आहे. अशा घटना घडू नयेत यासाठी निश्चितच कठोर कारवाईची गरज आहे.

**बांधकाम कंपनी चालवणारे पुण्यातले एक बिल्डर विशाल अग्रवाल यांच्या सतरा वर्षांच्या मुलाने वडिलांची नवी-कोरी आलिशान पोर्श मोटार रात्री अडीच-तीनच्या सुमारास भरधाव सोडली आणि या मोटारीच्या जोरदार धडकेमुळे मोटरसायकलवरून चाललेला एक तरुण आणि एक तरुणी जागीच ठार झाले. पुण्यात कल्याणी नगर भागात पहाटे तीन वाजता ही दुर्घटना घडली. जे झाले ते इतके भयंकर आणि सुन्न करणारे होते की बराच वेळ नेमके काय घडले आहे याचा अंदाजच अनेकांना आला नाही. रस्त्यावरील लोकांनी मोटारचालक मुलाला खाली खेचून मारहाण केली आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. हे दिवटे चिरंजीव एका बिल्डरचे पुत्र आहेत हे कळल्यावर तर पुणेकरांचा संताप अनावर झाला नसता तरच नवल होते. या दुर्घटनेत दोघा जणांचा जीव हकनाक गेला. पण त्याहूनही सुन्न करणारा प्रकार पुढे घडला. या मुलाने मद्य प्राशन केल्याचे निष्पन्न झाले. तो अल्पवयीन असल्याचे सांगण्यात आल्याने त्याला 'ज्युवेनाइल' म्हणजे बालगुन्हेविषयक न्यायालयासमोर उभे करण्यात आले आणि अवघ्या काही तासांत तो मुलगा जामिनावर बाहेर आला. त्याचा मद्यसेवनाबाबतचा अहवालही नकारात्मक आल्याचे सांगण्यात आले. न्यायालयाने जामिनाची ठेवलेली अटही अजब होती. संबंधित आरोपीने घडलेल्या प्रकाराबद्दल तीनशे शब्दांत निबंध लिहून द्यावा ही ती अट होती. जणू काही निबंध लिहून घेतल्यानंतर त्याचे मनपरिवर्तन होऊन त्याला पश्चात्ताप होणार होता. हे सारेच कुठल्याही सुजाण नागरिकाला अस्वस्थ करणारे आहे. हा बिल्डरपुत्र वडिलांची जी पोर्श गाडी घेऊन पबमध्ये गेला होता, त्या गाडीची धड नोंदणीही झाली नव्हती. मोटार वाहन नियमानुसार तो अल्पवयीन पोरटा बेकायदा गाडी चालवत होता. त्याच्याकडे लायसन्सही नव्हते हे ओघाने आलेच. बेदरकार मद्यधुंद ड्रायव्हिंग, त्याचे दोन तरुण बळी आणि तरीही बिल्डरचा मुलगा मात्र तुरुंगाबाहेर! ही कुठली न्यायव्यवस्था म्हणायची? या दुर्घटनेत जीव गमावणारा तरुण आणि तरुणी या दोघांनीही अजून धड पंचविशीही गाठलेली नव्हती. दोघेही आयटी इंजिनीअर होते असे सांगण्यात येते. शिक्षण आटोपून व्यवसाय-नोकरीला सुरुवात करणारे हे दोघेही या दुर्घटनेत काही कारण नसताना प्राण गमावून बसले आहेत. बिल्डरच्या त्या दिवट्या पोराला मात्र काहीच झाले नाही. सदरील बिल्डरचे लागेबांधे वरपर्यंत असल्यामुळेच त्याचा मुलगा आरामात सुटला, अशी उघड चर्चा यामुळे सुरू झाली. रात्रीअपरात्री बाहेर हिंडणारा आपला मुलगा करतो तरी काय, याची चौकशी त्याच्या जन्मदात्यांना करावीशी वाटली नाही का, असा प्रश्न केला जातो आहे. या प्रकरणी राजकीय आरोप-प्रत्यारोप लागलीच सुरु झाले. तथापि, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनीही, कोणाचाही मुलाहिजा न ठेवता तपास करावा आणि कठोरात कठोर शिक्षा होईल असे बघावे अशा सूचना पुणे पोलिसांना दिल्या. या घटनेमुळे साऱ्यांचाच जीव हळहळला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी पुणे पोलिस आयुक्तालयाला भेट देऊन पोलिसांसोबत बैठक घेतली. अशा घटना घडू नयेत यासाठी कठोरतम पावले उचलायला हवीत, यात शंका नाही.**

# राज्यात मतदानाची सरासरी कमी होण्यास जबाबदार कोण?



**खबरबात**
**नितीन देशमुख**

लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदानाची सरासरी कमी झाल्याचे दिसून आले आहे. राज्यात मतदान कमी होण्याला वाढते तापमान हे कारणीभूत आहेच, पण त्याबरोबरच निवडणूक शाखा, निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले कर्मचारी आणि ओळखपत्र बनवणारेही जबाबदार आहेत. लाखो मतदारांना आपल्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणाऱ्यांवर निवडणूक आयोगाने कठोर कारवाई न केल्यास देशातील लोकशाहीचा मोठा उत्सव अशी जाहिरात करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न व्यर्थच आहे, असे खेदाने म्हणावे लागेल.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी निवडणूक आयोगाने अनेक प्रयोग केले. सखी मतदार केंद्र, प्रत्येक मतदार केंद्रावर आरोग्य पथक, अपंग व ज्येष्ठांची स्वतंत्र रांग, ८५ वर्षांवरील मतदारांच्या घरी जाऊनही मतदान घेण्यात आले. शासनाने मतदारांना पगारी रजा दिली. खासगी आस्थापनांनाही कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी किवा सवलत देण्याचे आदेश दिले. एवढे करूनही मतदानाची टक्केवारी कमी होत असेल, तर आयोगाने आता स्वत:च्या चुकांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. महसूल खात्यामध्ये एक निवडणूक शाखा आहे. या शाखेतील कर्मचारी कशा प्रकारे काम करतात याची माहिती घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. या शाखेकडे अनेक वेळा मतदारांनी नोंदणीसाठी नमुन्यात अर्ज करूनही मतदार यादीत नावे का येत नाहीत? मतदारांनी भरलेले अर्ज गायब कोठे होतात? हा संशोधनाचा विषय बनला आहे. अनेकांनी आपण तीन ते चार वेळा अर्ज करूनही आपले नाव यादीत नसल्याची तक्रार केली. त्यांच्याकडे प्रत्येक वेळा अर्ज केल्याची पोहच होती हे विशेष. त्यामुळे ही नावे यादीत समाविष्ट न केल्याबद्दल जबाबदारी नक्की करून त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

मतदान ओळखपत्रावर चुकीची माहिती छापणाऱ्या ठेकेदारावर कोणतीही कारवाई केली जात नाही, पण त्याच्या चुकीमुळे अनेकांना मतदान करण्याचा आपला हक्क बजावता आला नाही. राजा कुटुंबीयांनी ठाण्याहून पनवेलला आल्यावर आपल्या कुटुंबाची नावे पनवेल येथे मतदार यादीत नोंदवण्यासाठी अर्ज केला. त्यांच्या कुटुंबातील दोघांचीच नावे आली, पण त्यात दोन्ही ओळखपत्रावर मुलाचे नाव, मात्र एकावर बापाचा फोटो. मतदार नोंदणी करताना अर्जावर फोटो चिकटवून दिला जातो. तो बदलून पुरुषाच्या जागेवर महिलेचा फोटो लावण्याची ही किमया हे कर्मचारीच करू शकतात. मतदार ओळखपत्रात दुरूस्ती करण्यास दिल्यास कोणतीही दुरूस्ती न करता तुम्हाला पुन्हा तेच ओळखपत्र दिले जाते. रायगडच्या निवडणूक उपजिल्हा अधिकारी राहिलेल्या वैशाली माने या माणगावला तहसीलदार असताना माझ्या मुलीच्या ओळखपत्रात झालेली चूक दुरूस्त करण्यासाठी अर्ज भरून त्यांच्यासमोर दिला. त्यांनी स्वत: निवडणूक शाखेतील कर्मचाऱ्याला ते दाखवून दुरूस्ती करायला सांगितली, पण चूक तशीच. त्यानंतर पुन्हा एकदा अर्ज केला तरी अद्याप चूक तशीच आहे. याचा अर्थ निवडणूक शाखेच्या कर्मचाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण नाही, त्यांना कोणी जाब विचारात नाही. फक्त टोपल्या टाकण्याचे काम कर्मचारी करीत आहेत हे सिद्ध होत आहे.

लोकसभा निवडणूक २०२४साठी अधिकाधिक लोकांनी मतदान करावे यासाठी निवडणूक आयोगाने अनेक योजना आखल्या, पण त्या प्रत्यक्षात आणण्यात निवडणूक निर्णय अधिकारी कमी पडल्याचे दिसते. त्यांनी फक्त आपले फोटो छापून मिरवून घेण्याचे काम केले. पनवेलमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नाव नोंदणीबाबत किवा बीएलओची माहिती घेण्यासाठी गेल्यास ते जागेवर सापडत नव्हते. त्यामुळे बीएलओने प्रत्यक्षात काय काम केले हे कोणालाच माहीत नाही. मतदानाच्या स्लिप आणि ओळखपत्र वाटप करण्याचे काम ते दिलेल्या कर्मचाऱ्यांनी केले नव्हते हे प्रत्येक मतदान केंद्राबाहेर ते गठ्ठे घेऊन बसले होते यावरून दिसून येते. एकाच कुटुंबातील एकत्र राहणाऱ्या चार माणसांची नावे चार वेगवेगळ्या ठिकाणच्या यादीत टाकलेली असतात. ती शोधणे अवघड जाते. त्यामुळे मतदार स्लिपवर अवलंबून राहतात. स्लिप न मिळाल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आम्ही या उन्हात नावे कोठे शोधत फिरायचे म्हणून मतदानाला गेलो नाही असे सांगितले. या सगळ्यामुळे खरेतर मतदान कमी झाले. निवडणूक आयोगाने याची जबाबदारी निश्चित करून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

या वेळी तृतीयपंथीयांची नोंदणी केल्याचा डंका मोठ्या प्रमाणात पिटण्यात आला. प्रत्यक्षात पनवेलमध्ये ३६ जणांनी ऑक्टोबरमध्ये फॉर्म भरले असताना फक्त १७ जणांचे मतदान ओळखपत्र आले. रायगडचे समाजकल्याण अधिकारी दोन तृतीयपंथीयांनी मतदान करावे म्हणून त्यांना फोन करीत होते, पण त्यांचे नाव कोठे हे त्यांना सांगता येत नव्हते. माणगाव किवा महाडला आहे जाऊन मतदान करा एवढेच सांगत असल्याने त्यांनी माझ्याशी संपर्क साधला. आम्ही कोठे जाऊन मतदान करू? ही अवस्था असेल तर याला जबाबदार शासकीय अधिकारीच आहेत. त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. निवडणूक आयोगाने याची गंभीर दाखल घेणे गरजेचे आहे.

निवडणूक म्हणजे वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांना कमावण्याची पर्वणीच वाटते, कारण या खर्चाचे ऑडिट होत नसल्याचे समजते. त्यामुळे अनेक ठिकाणी सामाजिक संस्थांना हाताशी धरून कार्यक्रम केला जातो. त्याचे फोटो काढून यू ट्युबवर टाकून काम केल्याचे दाखवले जाते. या कार्यक्रमांना अनेक वेळा अधिकारी येत नाहीत. आले तर फक्त लेक्चर देऊन जातात असा अनुभव आहे. अनेक वेळा ठेकेदारांना हाताशी धरून दुप्पट बिले घेतली जातात. राखीव कर्मचाऱ्यांना दिवसभर बसवून ठेवले जाते. एका मतदारसंघात दुसऱ्या मतदारसंघातील कर्मचारी आणले जातात. पहाटे घरून आलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक ठिकाणी जेवणही दिले जात नाही. याची तक्रार निवडणूक काळात पत्रकार म्हणून माझ्याकडे अनेक वेळा करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने काळात केलेल्या खर्चाचे ऑडिट होणे गरजेचे आहे.

लोकसभा निवडणुकीच्या अनुभवावरून राजकीय पक्ष, आमदार, खासदार यांनी आता सावध होऊन याबाबत लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांनी निवडणूक आयोगाकडे याबाबत तक्रार करून संबंधितांवर कारवाईची मागणी करणे गरजेचे आहे, पण आपल्या कार्यकर्त्यांनीही वेळीच लक्ष न दिल्याने हे प्रकार घडत असल्याने त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे; अन्यथा लवकरच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतही लाखो मतदारांना आपल्या हक्कापासून वंचित राहावे लागेल. त्याचा फटका थोड्या मताने निवडणूक हरणाऱ्या उमेदवाराला बसेल हे लक्षात ठेवले पाहिजे.


पनवेल तहसील कार्यालयात दालनासमोर मोठ मोठ्या खोक्यात हजारो मतदारांची कार्ड पडलेली आहेत. त्यांचे वाटप का केले नाही ? त्याची जवाबदारी कोणाची? एनजीओमार्फत वाटप का केले नाही याचे उत्तर राजकीय पक्षांनी मागणे गरजेचे आहे. निवडणूक आयोगाच्याही गोष्ट निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे.

भिवंडी मतदारसंघात अवधूत दातार हा तरुण अमेरिकेतून खास मतदानासाठी आला. तो त्याचे नाव शोधण्यासाठी अनेक बूथ फिरला, पण नाव न सापडल्याने निराश झाला. आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी एवढा खर्च करून आल्यावर त्याला काय वाटले असेल याचा विचार करून यावर ठोस कार्यवाही करणे आवश्यक आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### नेकबँडसारखा एसी; घेऊन फिरा कोठेही

उन्हाळ्यात एसीची मागणी खूप असते. अशा परिस्थितीत आज तुम्हाला एका वेगळ्या प्रकारच्या एसीबद्दल सांगणार आहोत. तुम्हाला तो अगदी कुठेही घेऊन फिरत येणार आहे. आम्ही तुम्हाला 'Neck Mini AC'बद्दल माहिती देणार आहोत.



**SFZ Portable Rechargeable Neck AC**

तुम्ही हे डिव्हाईस फ्लिपकार्टवरून खरेदी करू शकता. तुम्ही ते सहजपणे तुमच्या गळ्यात घालू शकता. यामध्ये तुम्हाला स्पीडचे वेगवेगळे पर्यायही दिले आहेत. सध्या यालाही मोठी मागणी आहे. हे डिव्हाईस विजेशिवायही थंड होऊ लागते. शिवाय हे वजनालाही खूप हलके आहे आणि हे सतत घातल्यास कोणतीही अडचण येणार नाही. त्याची किंमत १,४२४ रुपये आहे.

**PAVITYAKSH AC Neck Fan Cooler**

एअर कंडिशनरचे नाव ऐकताच ते कूलिंग कसे करते हे तुम्हाला नक्कीच स्पष्ट झाले असेल. जर तुम्ही हे गळ्यात घातले तर तुम्हाला खूप चांगली हवा मिळेल. यासाठी तुम्हाला वेगळे काहीही करण्याची गरज नाही. ते चालू किंवा बंद करण्यासाठी स्वतंत्र पॉवर बटण प्रदान केले आहे. त्याची किंमत ४९९ रुपये आहे. म्हणजे तुम्हाला जास्त काळजी करण्याची गरज नाही.


**INDRAMAMANSHA Neck AC**

फ्लिककार्टवर ही एक नवीन डील आहे. हे खरेदी करण्यासाठी तुम्हाला ५९९ रुपये खर्च करावे लागतील. यामध्ये अनेक डिझाईनही आहे. याशिवाय तुम्हाला त्यावर अनेक कार्ड पर्यायदेखील पहायला मिळतात. कंपनीकडून उत्पादनाची एक वर्षाची वॉरंटी दिली जात आहे. या सर्व उपकरणांचे वैशिष्ट्य म्हणजे ते विजेशिवायही काम करतात. ते मल्टी कलर असल्याने तुम्हाला जास्त त्रास होणार नाही.

जर तुम्ही या उन्हाळ्यासाठी सुटसुटीत कूलिंग डिव्हाईस शोधत असाल तर आम्ही काही नवीन कूलिंग फॅन्सबद्दल माहिती देणार आहोत. तुम्ही हे डिव्हाईस तुमच्या गळ्यात घालताच, आपोआप कूलिंग सुरू होईल. या व्यतिरिक्त त्याचे फीचर्सदेखील खूप वेगळे आहेत आणि तरीही किंमतदेखील कमी आहे.

हल्ली विज्ञान-तंत्रज्ञान बदलत आहे. त्यामुळे नवनवीन डिव्हाईस उपलब्ध होत आहेत. सध्या एसीदेखील नव्या प्रकारे बाजारात आले आहेत.

# समाजसुधारक राजाराम मोहन रॉय



**निमित्त**

आधुनिक भारतातील अग्रगण्य धर्मसुधारक व ब्राह्मो समाजाचे संस्थापक म्हणजे राजाराम मोहन रॉय. त्यांचा जन्म पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगरी या गावी २२ मे १७७२ रोजी झाला. कृष्णचंद्र बंदोपाध्याय हे त्यांचे प्रतितामह बंगालमधील नवाबाच्या नोकरीत होते. नवाबाच्या दरबाराने 'राय' ही सन्मानदर्शक पदवी त्यांना दिली. त्यांचे पितामह ब्रजविनोद रॉय यांनी नवाबाची नोकरी सोडून दिली. रामकांत रॉय यांच्या कुळात वैष्णव संप्रदात होते. राममोहनांची माता तारिणीदेवी यांचे माहेर राममोहन रॉय याचे पिता आणि पितामह हे परमधार्मिक होते.

राममोहन यांचे बंगाली, फार्सी व संस्कृत या तीन भाषांचे प्राथमिक अध्ययन घरीच झाले. वयाच्या अठराव्या वर्षी ते बिहारमधील पाटणा येथे अरबी आणि फार्सी यांच्या शिक्षणासाठी गेले. कुराणाचाही त्यांनी अभ्यास केला. मुल्ला व मौलवी त्यांचा अरबी, फार्सी पांडित्याने विस्मित होत. इस्लाम धर्मातील आणि सूफी संप्रदायातील त्यांची पारंगतता पाहून माता-पित्यांनी संस्कृत अध्ययनासाठी त्यांची वाराणसीला रवाना केले. श्रुती स्मृती-पुराणांचा, कुराणाचा आणि बायबलचा सखोल अभ्यास त्यांनी केला. वयाच्या सोळाव्या वर्षी ते आपल्या गावी परतले.

राममोहन यांनी आपले मूर्तिपूजाविरोधी विचार आपल्या पित्याला व मातेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र माता-पिता आणि राममोहन यांच्यामध्ये जबरदस्त मतभेद उत्पन्न झाला. त्यांची माता-पित्यावर श्रद्धा होती आणि विलक्षण भक्तीही होती. मतभेदामुळे राममोहन यांना घर सोडावे लागले. त्यांनी भारतभर प्रवास केला. बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी ते तिबेटमध्ये गेले.

१९७०मध्ये स्वगृही परतल्यावर राममोहन यांच्या माता-पित्यांचा रागही निवळला होता, परंतु माता-पित्यांची त्यांनी निराशा केली. त्यांची मूर्तिपूजाविरोधी व बहुदेवतावादविरोधी मते अधिकच ताठर व कणखर बनली होती. भोवतालच्या समाज सनातनी व रूढिनिष्ठ असल्याने त्यांचा द्वेष करू लागला. पिताजींनी त्यांना घराबाहेर काढले.

तत्कालीन रीतीला अनुसरुन राममोहनांचे बालपणीच पहिले लग्न झाले होते. प्रथम पत्नीच लवकरच निवर्तल्यामुळे वडिलांनी १७८१ व १७८२ साली त्यांची दोन लग्ने लावून दिली. १८०० साली त्यांना पुत्रप्राप्ती झाली. पुत्राचे नाव राधाप्रसाद असे ठेवले. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने घरची सांपत्तिक स्थिती ठीक असूनही त्यांना सरकारी नोकरी पत्करावी लागली. १८०३मध्ये डाक्का येथील कलेक्टर टॉमस वुडफर्ड याचे दिवाणपद स्वीकारले. त्याच वेळी रामकांत रॉय निवर्तले. याच सुमारास राममोहनांनी ग्रंथलेखनास सुरुवात केली. फार्सी भाषेत त्यांनी 'ईश्वरभक्तांस देणगी' (तुहफास-उल्-मुवहिद्दीन) या अर्थाच्या शीर्षकाखाली एक निबंध प्रसिद्ध केला. त्याचे सार असे-सृष्टिकर्ता व पालनकर्ता एक निराकार परमेश्वर आहे. हा सिद्धांत सर्व धर्मांचा पाया होय. निरनिराळ्या धर्मांच्या लोकांनी या धर्मतत्त्वावर भलभलत्या कल्पनांचा डोलारा चढवला. त्यामुळे भिन्नभिन्न धर्मसंप्रदाय अस्तित्वात आले.

१८१८ साली सतीची प्रथा बंद व्हावी म्हणून समाजातील प्रतिष्ठित मंडळीच्या सह्यांसह एक अर्ज त्यांनी सरकारकडे पाठवला. ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा जाहीर झाला. आपल्या धर्मविषयक व ईश्वरविषयक उदार तत्त्वज्ञानाचा व उपासनापद्धतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राह्म समाजाची (ब्राह्मो समाजाची) स्थापना केली. पुढे ते इंग्लंडला रवाना झाले. त्या वेळी दिल्लीच्या बादशहाने खुष होऊन त्यांना 'राजा' हा किताब दिला. परदेशात त्यांचे अनेक ठिकाणी सत्कार झाले. याच वेळी ते अकस्मात आजारी पडले आणि २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**



मुरुड : मासेमारी करून आलेल्या होड्या किनारी आल्यावर स्थानिक लोक तसेच पर्यटक मासळी खरेदीस येतात. (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### बद्धकोष्ठतेवर काही रामबाण उपाय



बद्धकोष्ठता उपचार करणे खूप महत्त्वाचे आहे. बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यासाठी लोक अनेकदा वेगवेगळ्या प्रकारची औषधे घेतात, परंतु त्यांचा प्रभाव फक्त तोपर्यंत टिकतो जोपर्यंत तुम्ही त्यांचे नियमित सेवन करता. त्यांचा वापर बंद केल्यावर बद्धकोष्ठतेची समस्या पुन्हा सुरू होते. बद्धकोष्ठतेच्या समस्येवर मात करण्यासाठी आपल्याला आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. याशिवाय काही घरगुती उपायांनीही बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून सुटका मिळवता येते.

जर तुम्ही बद्धकोष्ठतेच्या समस्येने त्रस्त असाल तर एक चमचा इसबगोलचा भुसा एका ग्लास दुधात किंवा पाण्यात मिसळून रात्री झोपण्यापूर्वी प्या. इसबगोलमध्ये विरघळणारे फायबर भरपूर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते.

एरंडेल तेलामध्ये रेचक गुणधर्म असतात, जे आतड्यांसंबंधी हालचाल वाढवण्यास मदत करतात. याच्या सेवनाने आतड्यांच्या कार्याला गती मिळते आणि गुदाशय स्वच्छ होतो. रात्री झोपण्यापूर्वी एक ते दोन चमचे एरंडेल तेल एका ग्लास कोमट पाण्यात मिसळून सेवन करू शकता.

बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी त्रिफळा चूर्णाचे सेवन करू शकता. हे शरीरातील चयापचय वाढवते आणि पचनसंस्था सुधारते. त्यामुळे मल पास करणे सोपे होते. रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा त्रिफळा पावडर एक ग्लास कोमट पाण्यासोबत सेवन करू शकता. यामुळे सकाळी तुमचे पोट सहज साफ होईल.

बद्धकोष्ठतेवर उपचार करण्यासाठी अंबाडीच्या बिया खूप प्रभावी आहेत. यामध्ये फायबर मुबलक प्रमाणात असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. याच्या सेवनाने मल मऊ होऊन सहज बाहेर पडतो. याच्या नियमित सेवनाने आतडे स्वच्छ होतात आणि पचनसंस्था निरोगी राहते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा भाजलेल्या अंबाडीच्या बियांचे एक ग्लास कोमट पाण्यासोबत सेवन करू शकता. यामुळे दुसऱ्या दिवशी तुमचे पोट साफ होईल.

बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही मनुके दुधात उकळून रात्री खाऊ शकता. त्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. तसेच, आतड्यांच्या हालचालींना चालना देण्यास मदत करते. यासाठी एका ग्लास दुधात आठ ते दहा मनुके उकळून त्याचे सेवन करा. तुम्हाला हवे असल्यास गरम दुधासोबत मनुकेही खाऊ शकता.

# रायगडचा बारावीचा निकाल ९४.८३ टक्के

## सलग दुसऱ्या वर्षी रायगड मुंबई विभागात अव्वल

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२४मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९४.८३ टक्के लागला. मुंबई विभागात रायगड अव्वल आहे. सलग दुसऱ्या वर्षी रायगड मुंबई विभागात अव्वल आला आहे. यंदादेखील उत्तीर्ण होण्यात मुलींनी मुलांना मागे टाकले आहे. तळा आणि म्हसळा तालुक्यांमधील १०० टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मागील वर्षापेक्षा यंदा रायगडचा निकाल तीन टक्क्यांनी वाढला आहे.



फेब्रुवारी २०२४मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यात २९ हजार ४६८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यातील २९ हजार ३४६ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. त्यापैकी २७ हजार ८३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्यात मुलींना मुलांना मागे टाकले आहे. १४ हजार ८६० मुले परीक्षेला बसले होते. त्यातील १३ हजार ७७८ मुले उत्तीर्ण झाली. ९२.७१ मुले उत्तीर्ण झाली. १४ हजार ४८६ मुली परीक्षेला बसल्या होत्या. त्यातील १४ हजार ५३ मुली उत्तीर्ण झाल्या. उत्तीर्ण होण्यात मुलींची टक्केवारी ९७.०१ आहे. म्हसळा तालुक्याचा सर्वाधिक ९८.६८ टक्के निकाल लागला आहे.

शास्त्र शाखेचा निकाल सर्वाधिक ९८.७४ टक्के लागला. कला शाखेचा ८५.७२ टक्के, वाणिज्य शाखेचा ९५.२२ टक्के तर किमान कौशल्यावार आधारित अभ्याक्रमाचा निकाल ८७.११ टक्के लागाला.

रायगडचा एकूण निकाल ९४.८३ टक्के लागला. गेल्या वर्षापेक्षा यंदा रायगडच्या निकाल तीन टक्क्यांनी वाढला आहे. गेल्या वर्षी रायगडचा निकाल ९१.९४ टक्के इतका लागला होता.

### तालुकानिहाय निकाल


| | |
|---|---|
| पनवेल | ९७.८२ टक्के |
| उरण | ९३.२२ टक्के |
| कर्जत | ९४.२० टक्के |
| खालापूर | ९०.०३ टक्के |
| सुधागड | ८४.३८ टक्के |
| पेण | ९०.९४ टक्के |
| अलिबाग | ९३.३२ टक्के |
| मुरूड | ९०.५२ टक्के |
| रोहा | ९५.२२ टक्के |
| माणगाव | ९८.२५ टक्के |
| तळा | ९७.८६ टक्के |
| श्रीवर्धन | ९५.९८ टक्के |
| म्हसळा | ९८.६८ टक्के |
| महाड | ९२.०३ टक्के |
| पोलादपूर | ९०.३९ टक्के |

# आंबेनळी घाटात भूस्खलनाचा वाढता धोका

## दरडी कोसळण्याच्या घटना; उपाययोजनांची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर मार्गावरील आंबेनळी घाटामध्ये २०२१मध्ये भूस्खलनाच्या घटना अतिवृष्टीदरम्यान झाल्यानंतर सातारा सार्वजनिक बांधकाम विभागाने महाबळेश्वर ते प्रतापगडदरम्यान रस्त्याचे मजबुतीकरण आणि दरडप्रवण क्षेत्रातील बंदिस्तीची कामे पूर्ण केली आहे, मात्र रायगड जिल्ह्यातील पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागामध्ये झालेल्या दरडप्रवण क्षेत्रातील कामांखेरिज अनेक ठिकाणी भूस्खलनाचा धोका असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. गेल्या सात दिवसांतील अवकाळी पावसामुळे आंबेनळी घाटामध्ये काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्याचे दिसून येत आहे.





पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर राज्यमार्गावर दरडी कोसळण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून वाढले आहे. यंदादेखील आगामी पावसाळ्यामध्ये दरडी कोसळण्याची शक्यता असल्याने काही दरडप्रवण क्षेत्रांच्या तळाशी रस्त्यालगत काँक्रीटच्या भिंती तर काही ठिकाणी गॅबियन पद्धतीच्या लोखंडी जाळी आणि दगडाच्या भिंती उभ्या करण्यात आल्या आहेत.

काळकाई मंदिर ते वाडा कुंभरोशी दरम्यानच्या दरडी कोसळण्याच्या घटनेवेळी रस्त्यालादेखील तडे गेले, मात्र त्याठिकाणी डोंगरउतारावरचे ढिगारे भविष्यात कोसळण्याची शक्यता कायम आहे. आंबेमाची, दाभिळ, पायटा आणि कुंभळवणेपर्यंतच्या भागात मातीचे ढिगारे आणि मोठ्या दरडी कोसळण्याची शक्यता दिसून येत आहे.

आंबेनळी घाटाच्या हद्दीत सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत अनेक प्रकारची बांधकामे गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये झाली असून या ठिकाणीदेखील दरडी कोसळू शकतील. यामुळे नजिकच्या काळामध्ये मोठी दुर्घटना घडून अथवा दरडी कोसळून काही काळ घाटबंद ठेवण्यापेक्षा आधीच उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# अल्पवयीन मुली व महिलेला पळवून नेल्याच्या घटना

### वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वडखळ येथील फिर्यादी यांच्या अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची व दुसरी घटना लाखोले येथून महिला व तिच्या सहा वर्षीय मुलीस पळवून नेल्याची घटना घडली आहे.

वडखळ येथील रहिवासी प्रदीप म्हात्रे यांच्या मालकीच्या घरात भाडेकरू म्हणून रहात असलेल्या फिर्यादींची अल्पवयीन मुलगी एकटीच घरी असताना ११ मे रोजी तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

दुसरी घटना लाखोले येथे घडली. फिर्यादींच्या घरातून ३० एप्रिल रोजी पीडित महिला (वय ३२) व मुलगी (वय ६) यांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रणजीत जाधव हे करीत आहेत.

# नसरापूर ग्रामपंचायतीमधील वीजपुरवठा पाचव्या दिवशी पूर्ववत

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात वादळी वाऱ्याने विजेचे खांब कोसळल्याने खंडित झाला होता. महावितरणकडून शर्थीचे प्रयत्न झाल्यानंतर पाचव्या दिवशी नसरापूर ग्रामपंचायतीमध्ये वीजपुरवठा पूर्ववत झाला आहे.

ग्रामपंचायत नसरापूर हद्दीतील कळंबोली वाडी येथे असलेला सबस्टेशनवरून जाणारी मुख्य वीजवाहिनी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने तुटली होती. चिंचवली, गणेगाव, सालवड, चांधई, कळंबोली गावातील त्याच बरोबर नेरळ, कशेळे, कडाव, विभागाला पोहचवल्या जाणाऱ्या पाच मुख्य वीजवाहिनीचे खांब तसेच असंख्य झाडे पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता.

नेरळ, कशेळे विभागात वीज पूर्ववत करण्यात आली, परंतु काही भागात फार मोठ्या प्रमाणात अडचणी उद्भवल्या होत्या. इतक्या मोठ्या प्रमाणात वीज खांब बसविण्यास अडथळा निर्माण झाले होता. १८ मुख्य वीजवाहिनी खांब आणि दोन रोहित्र पडल्याने अत्यंत अवघड परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करता येत नव्हता.

सर्व प्रकारच्या अडचणीवर मात करून सर्व विभागातील वीज पुरवठा रात्री पूर्ववत करण्यात यश आले. पनवेल कार्यकारी अभियंता गणेश लटपटे, कर्जतचे उपकार्यकारी अभियंता प्रकाश देवके, सहाय्यक अभियंता वैभव सिंग यांनी वीज प्रत्येक विभागाला वीज खंडित होणारे नाही याची काळजी घेतली. महावितरण अधिकारी कर्मचाऱ्यांना नसरापूर ग्रामपंचायतीमध्ये ॲड. संपत हडप, ज्ञानेश्वर सावंत, जनार्दन कोळंबे, सचिन हडप, राजेश मोहिते, अतुल हडप, शुभम राऊत, सुरज हडप यांच्यासह ग्रामस्थांनी सहकार्य केले.


## SALE

Title Clear Industrial N.A. Plot Area 2 Lakhs Square Foot (approx) @ Vakkan-Pali Road, Village Rabgaon, Tal. Sudhagad, Dist-Raigad

**4 Km from Bombay-Goa Highway**

**-: Contact :-**

Sudhir Jadhav : **8208457931**

Udaysing Salunke : **9834083005**


# रोह्यातील विद्यार्थ्यांचे बारावीच्या परीक्षेत यश

**रोहे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२४मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

कोएसो मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान ९८.७२ टक्के, कला ८२.०५ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९९.२२ टक्के, किमान कौशल्य शाखेचा निकाल ७७.७७ टक्के निकाल लागला. प्रथम बुशरा पठाण ९१.६७ टक्के (वाणिज्य), द्वितीय अपूर्वा वाणी ९१.३३ टक्के (वाणिज्य), तृतीय गीता पवार ९०.३३ टक्के (वाणिज्य), चतुर्थ मधुरा दळवी ८७.८३ टक्के (वाणिज्य), पाचवा महिमा माजगुनकर ८६.६७ टक्के (वाणिज्य) यांनी यश संपादन केले आहे.

कै.स.प्र. जैन कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९१.८५ टक्के लागला. यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून प्रथम सुरज ठाकूर ९०.६७ टक्के, द्वितीय सार्थक म्हात्रे ८६.५० टक्के, तृतीय धनश्री पाटील ८०.३३ टक्के गुण मिळविले आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ८५.२६ टक्के लागला असून प्रथम निवेदन नाईक ७२.१७ टक्के, द्वितीय अमिषा ताडकर ६५.६७ टक्के, तृतीय सुमित म्हात्रे ६३.५० टक्के मिळविले आहे. कला शाखेत प्रथम भाग्यश्री ठाकूर ७१.६७ टक्के, द्वितीय अंकिता अंभोरे ६६.८३ टक्के, तृतीय प्रणय बडे ६३.३३ टक्के गुण मिळविले.


## पाहिजेत

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या ५ शाखा असून ८० कोटींचा मिश्र व्यवसाय आहे. त्याकरीता खालील पदाकरीता अनुभवी (कर्मचारी/अधिकारी) यांची आवश्यकता आहे. इच्छुक उमेद्वारांनी जाहिरातीपासून १५ दिवसात आपले अर्ज खालील पत्त्यावर पाठवावेत.

**१) अकाउंटंट (पद संख्या १)** शैक्षणिक पात्रता बी. कॉम/एम.कॉम.
- सहकारी बँकामधील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक
- जी.एस.टी., आय.टी व इतर टॅक्सेशन चे ज्ञान असणे आवश्यक
- कॉम्प्यूटरचे व अकौउंटिंगचे स्वतंत्र काम करणे आवश्यक
- पगार पात्रता व अनुभव या नुसार ठरविण्यात येईल.

**२) ज्युनिअर लिपीक (पद संख्या २)** शैक्षणिक पात्रता बी.कॉम, सहकारी बँकामधील किमान २ ते ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक तसेच कॉम्प्यूटरचे व अकाऊंटिंग चे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**पत्ता-**
**अध्यक्षा**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल, ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिरा शेजारी, टिळक रोड, पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. मोबा.नं. ८०८२५५५४०८**



### परिशिष्ट क्र. १६

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या या संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ... धारण करणाऱ्या **श्री/प्रभाकर शामराव वगळ** यांचे तारीख **२८/१०/२०२०** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी **१२.००** ते दुपारी **४.००** वा पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक : २१/०५/२०२४

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**


# लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पेण** : पेणमध्ये अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीविरोधात पेण पोलीस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी की, १ मे २०२३ ते २० एप्रिल २०२४दरम्यान महिला फिर्यादींची १४ वर्षांची अल्पवयीन मुलीला आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी वारंवार शारिरिक संबंध ठेवल्यामुळे ती गरोदर राहिली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पोकळे हे करीत आहेत.

# पेणच्या तामसीबंदर येथे प्राणप्रतिष्ठापना, जीर्णोद्धार सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील तामसीबंदर येथील एटूकोळी देवस्थान व महालक्ष्मी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा गुरुवारी (दि.२३) बालयोगी ओम शक्ती महाराज आमटेम (पालखार) यांच्या हस्ते होत आहे. या अगोदर बुधवारी (दि.२२) गावदेवी मंदिर जनवली बेडी ते एटूकोळी देवस्थान तामसीबंदर अशी ग्रामप्रदक्षिणा निघणार आहे.

या प्रदक्षिणेत तामसीबंदर, जनवलीबेडी, बोरकरवाडी, ठाकूर बेडी, घोडाबंदर, विठ्ठलनगर, मंत्रीवाडी, पैरणकरवाडी परिसरातील भाविक सहभागी होणार आहेत. एटूकोळी देव समुद्रकिनाऱ्यावरील मच्छीमार व शेतकऱ्यांसाठी हे देवस्थान हाकेला उभे राहत असे. म्हणून या कोळ्याला येथील शेतकऱ्यांनी देव मानले व त्याच्या लाकडी मूर्तीची हे मच्छीमार पूजा करू लागले. त्यांची भीती नाहीशी केली म्हणून येथील त्यांनी या मूर्तीची जीर्णोद्धार व प्रतिष्ठापना करण्याचे ठरविले होते.


### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, यांचे समोर

सहा. निबं. पनवेल, ता. पनवेल / कलम १०१ / सुनावणी नोटीस / २०२४
स. निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड, यांचे कार्यालय, पहिला माळा, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि. रायगड.

जा.क्र. :-१२३४/२०२४ दि.:- २१/०५/२०२४

**जाहिर नोटीस**

ज्या अर्थी श्री कुलस्वामी को ऑप क्रेडिट सोसा. लि. पनवेल या संस्थेने खालील सभासदांविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रकरण दाखल केले असुन त्यासंबंधीची सुनावणीची नोटीस दि. १८/०३/२०२४ दि. १५/०४/२०२४ व दि. २०/०५/२०२४ रोजी स. ११।३० वाजता खालील नमुद जबाबदार यांना रजिस्टर पोस्टाने पाठवली आहे. सदर नोटिस परत आलेले आहे.

या जाहिर नोटीस द्वारे एक संधी देण्यात येत असुन आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी सुनावणी दिनांक ०३/०६/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, पहिला माळा, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि. रायगड. या कार्यालयात होणार आहे, सुनावणीस आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत हजर रहावे, या कामी आपण गैरहजर राहिल्यास आपणांस या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन आपल्या अनुपस्थीत वादी संस्थेने दाखल केलेल्या अर्जावर एकतर्फी सुनावणी घेवून पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

| दावा | कर्जदार / जामिनदार | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १४४/२०२४ | श्री. इम्रान समशेर खान (कर्जदार)<br>श्री. जुनेद अकबर खान<br>सी. फिरोजाबी अकबरखान पठाण | रुम नं. ३०१, भुसार मोहल्ला, मेहमुद पॅलेस, ३ रा माळा, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | १,२२,८९०/- |
| १४५/२०२४ | श्री. इरफान खान सत्तार खान (कर्जदार)<br>श्री. अकबरखान अफजलखान पठाण<br>श्री. रफीक खान सत्तार खान<br>श्री. मोबीन अफजल खान | रुम नं. २०१, मदीहा अपार्टमेंट, मुस्लीम नाका, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | ९२,४०१/- |
| १४६/२०२४ | श्री. जुनेद अकबर खान (कर्जदार)<br>श्री. इलियास मुस्तकीम शेख<br>श्री. इम्रान समशेर खान | रूम नं. ३०३, भुसार मोहल्ला, मेहमुद पॅलेस, ३.रा माळा, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | १,१२,८५१/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक २१/०५/२०२४**

**सही/-**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**



### नोटिस

प्रो. क्र.३७१/२४

(विवेक कुमार गुप्ता)
प्र.अति. प्रधान न्यायाधीश
कुटुम्ब न्यायालय जबलपुर

**जबलपुर दिनांक १३/०५/२४**
**पेशी दिनांक.०९./०८/२४**
**MJCR प्रकरण क्र. २५५ /२३**

हर्षिता लघाटे

आवेदिक/आवेदिका

**विरूद्ध**

रवि कुमार गन्नू. उम्र ४४ वर्ष निवासी
श्री आशीष आपार्ट मेन्ट फ्लॅट नं. ४०१
सेक्टर न. ०४ न्यू पनवेल मुम्बई महाराष्ट्र

अनावेदक/अनावेदिका

आपको सूचित किया जाता है, इस न्यायालय में आपके विरुद्ध हर्षिता लघाटे ने आवेदन पत्र अंतर्गत धारा-. १२५- CrPC के तहत आवेदन पत्र पेश किया है। जिसकी सुनवाई दिनांक.०९/८/२४ को नियत है। सुनवाई दिनाक. ०९/०८/२४ को आप स्वयं इस न्यायालय में ठीक ११:०० बजे दिन में उपस्थित होकर अपना जबावदाता प्रस्तुत करें व दस्तावेजी प्रमाण प्रस्तुत करें। अनुउस्थित रहने पर प्रकरण में सुनवाई की जाकर कार्यवाही की एक पक्षीय आदेश पारित किया जावेगी। यदि किसी कारणवश उक्त पेशी दिनांक पर अवकाश घोषित हो जाता है, तो ठीक अगले कार्य दिवस पर प्रकरण में कार्यवाही की जायेगी।

आज दिनांक- १३/०५/२४ को मेरे हस्ताक्षर एवं इस न्यायालय की मोहरे से जारी किया गया।

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**(विवेक कुमार गुप्ता).**
**प्र.अति. प्रधान न्यायाधीश**
**कुटुम्ब न्यायालय जवलपुर**

# विमानाच्या धडकेने ४० फ्लेमिंगोचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

घाटकोपरला सोमवारी रात्री एमिरेट्सच्या विमानाला धडक देऊन चाळीस फ्लेमिंगोचा मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

नवी मुंबईतील नॅटकनेक्ट फाऊंडेशनने सांगितले की, पक्ष्यांच्या धडकेमुळे कोणत्याही प्रवाशाला हानी झाली असती तर त्याची जगात दखल घेतली गेली असती, परंतु ४० मूक फ्लेमिंगोच्या मृत्यूमुळे प्रशासनाला काही फरक पडत नाही, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.



फ्लेमिंगो पक्षी मुंबईला त्यांचे हिवाळी-उन्हाळ्याचे घर बनवतात, असे बीएचएनएस संशोधक मृगांक प्रभू यांनी सांगितले. नागरी उड्डाण महासंचालक यांना दिलेल्या आपल्या तक्रारीत, कुमार यांनी एमिरेट्सचे विमानाला पक्ष्यांची टक्कर कशी बसली? पायलटला त्याच्या रडारवरील पक्ष्यांचा कळप लक्षात आला नाही का? हे तपासण्यासाठी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्याची मागणी केली.

नवी मुंबई एन्व्हायर्नमेंटल प्रिझर्व्हेशन सोसायटीचे संदीप सरीन म्हणाले की, पक्ष्यांचा अपघात हृदयद्रावक आहे. देशातील शहरी भागातील एकमेव रामसर साइट ठाणे, नवी मुंबई, पनवेल, उरण खाडी भागात फ्लेमिंगो अभयारण्यात सुमारे एक लाख फ्लेमिंगो उडत राहतात.

रेस्किंग असोसिएशन फॉर वाइल्डलाइफ वेलफेयर (आरएडब्लूडब्लू)चे संस्थापक आणि वन विभागाचे मानद वन्यजीव वार्डन पवन शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, घाटकोपरमध्ये अनेक ठिकणी मृत पक्षी आढळून आल्याचे फोन येत होते. तसेच पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, पक्षांच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी या पक्ष्यांना पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले आहे.

मुंबईकडे येत असलेल्या अमिरेट्स फ्लाइटची धडक लागल्याने ४० फ्लेमिंगो मृत्यूमुखी पडले आहेत. ही घटना सोमवारी रात्री घडल्याचे सांगितले जात आहे. हा अपघात झाल्यानंतर फ्लेमिंगो घाटकोपरच्या वेगवेगळ्या भागात आढळून आले. तसेच या धडकेने विमानाचे देखील नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. असे असूनही विमानाची विमानतळावर सुरक्षीतपणे लँडिंग करण्यात आली. सध्या विमानातील सर्व प्रवाशी सुरक्षित असल्याचे सांगितले जाते आहे. वन अधिकारी आणि ॲनिमल ॲक्टिव्हीस्ट यांनी मेलेल्या फ्लेमिंगो पक्षांची विल्हेवाट लावली.

या अपघाताचे अनेक व्हिडीओ देखील समोर आले आहेत. सांगितले जात आहे की मृत फ्लेमिंगो मुंबईच्या अनेक वेगवेगळ्या भागातून सापडले आहेत. स्थानिक लोकांनी फोन करून याबद्दल माहिती दिली, त्यानंतर वन विभाग आणि इतरांना घटनास्थळी पोहचून फ्लेमिंगोना ताब्यात घेतले.

# बेलापूरमधील पारसिक हिलवर झालेल्या हत्येचा छडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीबीडी बेलापूर येथील पारसिक हिलवर गत शनिवारी झालेल्या मॉरिशस देशाचा नागरीक नवीनकुमार बाबू (वय ५३) याच्या हत्येचा छडा लावण्यात सीबीडी पोलिसांना यश आले आहे. या हत्या प्रकरणात पोलिसांनी सय्यद मुस्तकीन खान (वय २०) व दोन अल्पवयीन मुलींना अटक केली आहे.

मृत नवीनकुमार बाबु याने सदर मुलींसोबत दारु पिऊन गैरवर्तन केल्याने या तिघांनी मिळून त्याची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. न्यायालयाने खान याला २२ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे. तर चेंबूर येथून ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही मुलींची भिवंडी येथील बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे.

या प्रकरणातील आरोपी सय्यद मुस्तकीन खान हा नवीनकुमार राहत असलेल्या शहाबाज गाव परिसरातच राहत होता. नवीनकुमार त्याठिकाणी राहण्यास आल्यापासून खान याची त्याच्यासोबत चांगली ओळख झाली होती. चेंबुर येथे राहणाऱ्या १६ आणि १७ वयोगटातील दोन अल्पवयीन मैत्रिणी खानला भेटण्यासाठी येत असल्याने नवीनकुमार यांचीदेखील त्या मुलींसोबत मैत्री झाली होती. त्यानंतर गेल्या एक महिन्यापासून नवीनकुमार हा त्या मुलींना वेगवेगळ्या ठिकाणी भेटत होते. दोन्ही अल्पवयीन मुली या चेंबूरमधील नटराज चित्रपटगृहाजवळच्या फूटपाथवर राहत होत्या तसेच त्या बेलापूर सिग्नलवर पुस्तकांची विक्री करत होत्या.

शुक्रवारी मध्यरात्री मृत नवीनकुमार याने बेलापूर रेल्वे स्थानकाजवळ या मुलींची भेट घेतल्यानंतर त्याने दोघींना दुचाकीवरून पारसिक टेकडीवर नेले. त्याठिकाणी नवीनकुमार याने बिअर ढोसल्यानंतर त्याने दोन्ही मुलींसोबत गैरवर्तन

**तीन जणांना अटक**



करण्यास सुरुवात केली. त्यामुळे दोन्ही मुलींनी त्याला विरोध करण्यास सुरुवात केली, मात्र त्यानंतरदेखील नवीन कुमार याने त्यांच्यासोबत गैरवर्तन सुरूच ठेवल्याने अखेर त्यांच्यात मारामारी सुरु झाली. यादरम्यान, एका मुलीने आरोपी खान याला याबाबतची माहिती दिल्यानंतर तो काही वेळात पारसिक टेकडीवर पोहचला, मात्र तो टेकडीवर पोहचेपर्यंत दोन्ही मुलींनी नवीनकुमारला दगडाने मारायला सुरुवात केली होती.

यामुळे खानही त्यांच्यात सामील झाला. त्यानंतर त्या तिघांनी नवीनकुमार याचा मृत्यू होईपर्यंत त्याला दगडाने मारहाण केली. त्यानंतर तिघांनी त्याठिकाणावरून पलायन केले. शनिवारी सकाळी नवीनकुमार यांच्या डोक्यामध्ये दगड घालुन त्यांची हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्यानंतर सीबीडी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करुन आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

या वेळी बेलापूर येथील शाहबाज गावात राहणारा आरोपी सय्यद मुस्तकीन खान व नवीन कुमार यांच्यामध्ये असलेल्या मैत्रिची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता, त्याने गुह्याची कबुली दिली, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी दिली.

# दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिका मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्यासमवेत उपस्थित समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा. आरोग्य अधिकारी रत्नप्रभा चव्हाण, लेखाधिकारी मारोती राठोड, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कटके तसेच इतर अधिकारी, कर्मचारी यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. या वेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोत अशी प्रतिज्ञा घेत महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाने आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करू असा दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञेचा मजकूर सर्वांनी सामुहिकरित्या म्हटला.

# चिरनेरमध्ये बारावीच्या परीक्षेत मुलींची बाजी



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता बारावीच्या कला शाखेचा शेकडा निकाल ८१. ८१ टक्के लागला आहे. कला शाखेतील एकूण ७७ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यात प्रियल कोळी हिने ४२३ गुण मिळवून, ती ७०. ५० टक्क्यांनी चिरनेरच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये पहिली आली. सांज नारंगीकर हिने ३८५ गुण मिळवून ६४. १७ टक्क्यांनी ती ज्युनिअर कॉलेजमध्ये दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. अस्मिता पाटील हिने ३७६ गुण मिळवून, ६२.६७ टक्क्यांनी ज्युनिअर कॉलेजमध्ये ती तिसरी आली. वैष्णवी वशेणीकर हिने ३७५ गुण मिळवून ती ६२.५० टक्क्यांनी जुनियर कॉलेजमध्ये चौथी आली. काजल चव्हाण हिने ३६९ गुण मिळवून, ६१.५० टक्क्यांनी जुनिअर कॉलेजमध्ये ती पाचवी आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी. पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, खजिनदार समीर खारपाटील, सचिव सागर खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्राचार्य सुरदास राऊत, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, प्रशासकीय अधिकारी व्ही. ए. पाटील, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, तसेच ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मोबाईलमुळे वाचनीय पुस्तकांकडे पाठ



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

इंटरनेटच्या मायाजालाने छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांवर आपली मोहिनी घातल्याचे चित्र पाहावयास मिळत असून मैदानी खेळांबरोबरच वाचन संस्कृतीही मागे पडत चालली असून, अनेक वाचनीय पुस्तकांकडे चक्क पाठ फिरवली जात असल्याचे दिसत आहे.

रसायनी परिसरातील तरुणाईदेखील व्हॉटसअॅप, फेसबुकवरून दिवसभर चाटींग करण्यात गुंतली असून, पुस्तकापासून दुरावलेली आहे. वाचनालयातील पुस्तके, त्याचबरोबर बाजारपेठेच्या पुस्तक स्टॉलवरील वाचनीय पुस्तक खरेदी करण्यासाठी तरुणाई फिरकत नसल्याने काही विक्रेत्यांचे म्हणणे असून, यावरुन वाचनाची आवड लोप पावत असल्याचे दिसून येते.



**नवी मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी पाचव्या टप्प्यातील मतदान सोमवारी झाले. यामध्ये बेलापूर सेक्टर २० येथील क्रिस्टल पॅलेस सोसायटीच्या सर्व सदस्यांनी एकत्र जाऊन मतदान केले.**

# सारडे विकास मंचतर्फे श्रमदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंचच्या संकल्पनेतून कोमणादेवी ऑक्सीजन पार्कची निर्मिती झाली. या पार्कमध्ये असणाऱ्या छोट्या डोहाची सफाई गेली तीन वर्ष सारडे विकास मंच तर्फे करत आहे.

मातीचे भरलेला हा डोह तीन वर्ष लगातार सफाईनंतर यावर्षीदेखील या डोहाची सफाई सदाबहार दोस्ती प्रतिष्ठान गडप्रेमी गणेश भोईर, सागर पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या आयोजनातून हा डोह सफाईच काम करण्यात आले.



पावसाळ्यात येणारा पर्यटक लहान मुले त्यांना मनसोक्त पोहण्याचा आनंद मिळावा, यासाठी सारडे विकास मंच हा प्रयत्न करीत आहे हा डोह सफाई करून पाणी साठवण्याजोगे तयार केला.

यासाठी सदाबहार दोस्ती प्रतिष्ठानचे हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, तुकाराम गावंड, कामेश्वर म्हात्रे, सचिन पाटील, अरुण म्हात्रे, कैलास पाटील, जितेंद्र म्हात्रे, विजय गावंड, डॉ. हिराचंद पाटील, गडप्रेमी प्रतीक पाटील, ओम, रीया, अक्षता, गौरंग, सारा, विभा, निल, राजेश, श्रीवेद, आदींनी या उपक्रमास हातभार लावला या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

सर्व श्रमदात्याचे मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले. या श्रमदानासाठी उन्हात काम करणाऱ्या सर्व मावळ्यांना धनंजय म्हात्रे यांच्याकडून गोल कॅप देण्यात आली.

# पाण्याच्या स्त्रोतांची पातळी घटली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगेच्या ग्रामीण भागातील जलाशय कोरडे पडत आहेत. त्यामुळे परिसरात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे. विहीर, तलाव, छोटे जलसरोवर या सर्व पाण्याच्या स्त्रोतांची पातळी कमी होत आहे.

नदीपात्रातील पाण्याचे प्रमाण कमी झाले आहे, तर काही ठिकाणी जलाशय कोरडे पडत आहेत. काही दिवसात भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता महिलांकडून वर्तविली जात आहे. दरम्यान, दरवर्षी अपेक्षापेक्षा चांगला पाऊस परिसरात पडत असतो. पावसाळ्यानंतर पाण्याचे सरोवर जवळपास डिसेंबरपर्यंत प्रवाहित असतात.

एप्रिलपासून जलाशय कोरडे पडतात. येथील पाताळगंगा नदीच्या पाण्याच्या पातळीतही घट झाली असून, पाण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी होत असल्याने योग्य उपाययोजनांची गरज आहे.

# नवी मुंबईत उद्या बुद्ध महोत्सव; विविध ठिकाणी कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

भगवान गौतम बुद्ध यांचा २५६८ वा जयंती महोत्सव गुरुवार २३ मे २०२४ रोजी नवी मुंबईतील विविध बुद्ध विहारात विविध, बुद्ध संस्थानच्या वतीने साजरा होत आहे. या वेळी नवी मुंबई संयुक्त नागरिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने नेरूळ सेक्टर १२ येथील रामलीला मैदानावर बुद्धपौर्णिमा, मंगलोत्सव आणि जाहीर सभा गुरुवार २३ मे २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता पूज्य भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांच्या अध्यक्षतेखालील होणार असल्याचे निमंत्रक भीम महोत्सव प्रणेते शरद सरवदे यांनी सांगितले.

नवी मुंबईतील रबाले येथील प्रसिद्ध पंचशील बुद्ध विहारात माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली बुद्ध जयंती मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. सकाळी पंचशील ध्वजारोहण व बुद्धवंदना होणार आहे. सायंकाळी बुद्ध उपासक-उपासिका यांना खीरदान तसेच बौद्धभिक्षू यांना माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या उपस्थितीत चिवरदान होणार आहे. त्यानंतर बुद्ध शासन सभेचे प्रवचनकार पूज्यनिय विष्णु कदम यांचे बुद्ध आणि धम्म यावर परिसंवाद होणार आहे.

सीबीडी येथील आयकर कॉलनी मधील धम्मदीप सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष सुभाष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्धचार्य सत्यवान जाधव यांच्या उपस्थितीत विविध धम्म कार्यक्रम होणार आहेत. नेरूळ सेक्टर १० येथील कपिलवस्तू बुद्ध विहार सेवा समितीच्या वतीने बुद्ध जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी सकाळी धम्म प्रवचनकार भन्ते संघरत्न उत्तम यांचे धम्म प्रवचन होणार असून उपासिका सविता भिसे आणि उज्वला पवार यांच्या वतीने चिवरदान आणि खीरदान करण्यात येणार असल्याचे सचिव एल आर गायकवाड यांनी सांगितले. सायंकाळी पाच वाजता नेरूळ सेक्टर १२ येथील रामलीला मैदानावर भीम महोत्सवचे प्रणेते शरद सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा आणि मंगलोत्सव होणार आहे.

जुईनगर येथील प्रबुद्ध सेवा संघ, अमरपाली महिला मंडळ आणि प्रबुद्ध सेवा संघ उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सेक्टर २३ जुईनगर येथील बुद्ध विहारात बुद्ध पोर्णिमा महोत्सव, त्रिरत्न बुद्ध विहार लोकार्पण सोहळा आणि भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची स्थापना सोहळा अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या वेळी सकाळी धम्म पूजा आणि सायंकाळी गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक जुईनगर परिसरातून निघणार आहे. त्यानंतर देशातील विविध बुद्ध विहार येथून आलेल्या पूज्य भदंत यांच्या शुभ हस्ते उपस्थित उपासक आणि उपासिका यांना धम्मदेसना दीक्षा दिली जाणार असून या महोत्सवात मोठ्या संख्येने बुद्ध बांधवांनी उपस्थित रहावे, असे आमरपाली महिला मंडळाच्या अध्यक्षा जयश्री कापडणे यांनी सांगितले आहे.

# प्रसुतीपूर्व, प्रसुतीनंतर मानसिक आरोग्यासंबंधी समस्या; वेळीच निदान करण्याचा सल्ला

**नवी मुंबई : बातमीदार**

गरोदरपण हा स्त्रीचया आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. ज्यामुळे या काळात तिच्याकडून अनेक अपेक्षा ठेवल्या जातात. इतरांकडून वाढलेल्या अपेक्षा आणि अचानक अंगावर पडलेली जबाबदारी यामुळे बऱ्याचदा मानसिक दडपण येऊ शकते. शिवाय या काळात होणारे मूड स्विंग्स, शारिरीक समस्या मनावर आणखी दडपण आणतात. बऱ्याचदा आर्थिक समस्येमुळेही गरोदर महिलांना अशा प्रकारचे नैराश्य येते. तर काही जणींना शरीरात होणारे बदल सहन न झाल्यामुळे असे नैराश्य येण्याची शक्यता असते. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार ५० टक्के महिलांना प्रसुतीपुर्व तर ८० टक्के महिला प्रसुतीनंतर भेडसावतात मानसिक आरोग्यासंबंधी समस्या भेडसावतात.

काही जणींसाठी, आता पुढे आपले कसे होणार, याची चिंता असते. कदाचित गर्भधारणेबाबत नियोजन केलेले नसते, नवीन बाळाचा तुमच्या नातेसंबंधावर कसा





परिणाम होईल, याची काळजी वाटत असते, किंवा कदाचित बाळाच्या जन्माची चिंता असते. तुम्हाला प्रसूतीनंतर दुखत असेल, पुरेशी झोप न मिळाली नसेल, बाळाच्या जन्मामुळे भावनिक लाटा येत असतील आणि चांगली आई होण्याबाबत काळजी वाटत असेल, तर त्याचा मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. तुम्ही 'बेबी ब्लूज'बद्दल ऐकले असेल. ऐंशी टक्क्यांपर्यंत स्त्रियांना बाळंतपणानंतर चिडचिड, अतिसंवेदनशील होणे, मूड बदलणे अशा मानसिक अवस्थांमधून जावे लागते. (बहुतेकदा जन्मानंतर तिसरा दिवस आणि दहाव्या दिवसाच्या दरम्यान) नकारात्मक किंवा द्विधा मनःस्थिती किंवा मी एक चांगली आई होऊ शकते का, मी बाळाचा नीट सांभाळ करू शकेन का? याबद्दल शंका निर्माण होऊन नैराश्य येते.

प्रसूतीदरम्यान होणारे मानसिक विकार हे तीन प्रकारांमध्ये विभागले गेले आहेत बेबी ब्लूज, पोस्टपर्टम सायकोसिस आणि पोस्टपार्टम डिप्रेशन. बाळाच्या जन्मानंतर सुरू झालेला नवीन दिनक्रम, खाण्यापिण्याचे, झोपेचे बदललेले वेळापत्रक, पुरेशी विश्रांती न होणे अशा प्रकारांतून ही लक्षणे दिसण्यास सुरुवात होते, अशी माहिती डॉ. सुरभी सिद्धार्थ (सल्लागार प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ,मदरहूड हॉस्पिटल, खारघर) यांनी दिली.

# आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजनांबाबत प्रशिक्षण

## एनडीआरएफचा सहभाग; प्रात्यक्षिके केली सादर





**रायगड : रामप्रहर वृत्त**

आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांबाबत जनजागृतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ)च्या सहभागाने विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण सोमवारी (दि. २०) देण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत भूस्सखलन, पूर परिस्थिती काळात करावयाच्या उपाययोजना व प्रथमोपचार, सीपीआर पद्धत, रस्त्यावरील अपघात काळात करावयाच्या उपाययोजना व प्रथमोपचार, वायूगळती आपत्तीवर उपाययोजना या विषयावर प्रात्यक्षिक करण्यात आली.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, एनडीआरएफ पुणे, तहसीलदार कार्यालय पनवेल व सीकेटी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्तीविषयक जनजागृती व प्रशिक्षण कार्यकम आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत पनवेल येथे आयोजित प्रशिक्षणासाठी तहसीलदार विजय पाटील, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार उपस्थित होते.

या वेळी सिनिअर इन्स्पेक्टर महेंद्र पुनिया व जालिंदर फुंद यांच्या पथकाकडून प्रशिक्षण देण्यात आले. तहसीलदार विजय पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना आपत्ती निवारणामध्ये स्थानिक प्रशासकीय यंत्रणा व स्थानिक लोकांचा सहभाग किती महत्त्वाचा याची माहिती दिली तसेच आपदामित्रांनी मागील वर्षात केलेल्या काम सांगताना भविष्यात येणाऱ्या आपत्तीमध्ये स्थानिक यंत्रणा सतर्कतेने कार्यवाही करील, अशी अपेक्षा व्यक्ती केली.

निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. नागरी संरक्षण दल उरणचे श्री. म्हात्रे व त्यांचे पथक कार्यक्रमास उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी पनवेल व उरण तालुक्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी, आपदा मित्र, ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील, कोतवाल असे १५० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या प्रशिक्षणास सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.पाटील व एनएसएस प्रमुख आकाश पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मुरूड समुद्रकिनारी दगडी बंधारा बांधण्याचे काम जोरदार सुरू

## आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्न यशस्वी



**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नामुळे मुरूड समुद्रकिनारा सुशोभिकरण करण्यास अगोदरच कोट्यवधीचा निधी प्राप्त झाला होता. त्यामधून परेश हॉटेल ते गोल्डन स्वान हॉटेलपर्यंत बंधारा करण्यात आला तसेच तवसाळकर जेट्टी ते विश्रामधामपर्यंतचे काम जोरदार सुरू आहे. त्यातच आता गोल्डन स्वान हॉटेल ते मारुती नाका जेट्टीपर्यंत दगडी बंधारा बांधण्याच्या कामास जोरदार सुरुवात झाली आहे.

आमदार दळवी यांनी पुन्हा बंधाऱ्याच्या कामासाठी ४० कोटी रुपयांचा निधी प्राप्त केला आहे. या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. मोठ मोठी दगडे आणून ती जेसीबीच्या सहाय्याने व्यवस्थित रांगेत लावली जात आहेत. त्यामुळे या भागाचे सौंदर्य वाढणार आहे.

या भागातील दगडी बंधाऱ्याची उंची कमी झाल्याने समुद्राचे भरतीचे पाणी आत येऊन मोठ मोठी सुरुची झाडे उन्मळून पडली होती, परंतु आता दगडी बंधाऱ्याची उंची वाढल्याने असणारी सुरुची झाडे वाचण्यात मदत होणार आहे. साधारणपणे समुद्राच्या भरती रेषेपासून पाच फूट उंच असा हा दगडी बंधारा उभारण्यात येत असल्याने समुद्राचे पाणी आत येण्यास मज्जाव होणार आहे.

मुरूड समुद्रकिनारा सुशोभिकरणासाठी मोठा निधी आमदार महेंद्र दळवी यांनी मिळवून दिल्याने हे काम जलदपणे होताना दिसत आहे. अशातच मुरूडमधील पर्यटनवृद्धीसाठी बंधारा फारच सुबक व आकर्षित करणारा ठरणार आहे.



# माणगावच्या निकम कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव एजुकेशन ट्रस्ट माणगाव संचालित एस.एस. निकम ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगावने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या ज्युनिअर सायन्स कॉलेजचा बारावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून हूमेरा मुबीन अहमद झेटम या विद्याथीनीने ९२.६७ टक्के इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या कॉलेजमधून इफहम अकबर अली धनसे या विद्यार्थिनीने ८७.३३ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक राबीया नुरूल इसलाम अकलेकर या विद्यार्थिनीने ८७ टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे.

या कॉलेजमधून या वर्षी बारावीच्या परीक्षेसाठी एकूण ३५ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी १२ विद्यार्थी विशेष श्रेणीत, प्रथम श्रेणीत २२ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत एक विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे. या कॉलेजचा बारावीचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गामध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, संस्थेचे सर्व पदाधिकारी, एस.एस. निकम इंग्लिश स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगावच्या प्राचार्या, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, शाळेचे को-ऑर्डिनेटर, सर्व शिक्षकवर्ग शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# रायगड विभाग अधीक्षक डाकघर येथे १४ जूनला डाक अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड विभाग डाकघर अधीक्षक अलिबाग यांच्या कार्यालयाद्वारे १४ जून रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली असून इछूक ग्राहकांनी आपली तक्रार दोन प्रतीत अधीक्षक सुनील थळकर यांच्याकडे ६ जूनपर्यंत पोहचेल अशा रितीने पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार, समस्या ज्याचे निवारण सहा आठवडा कालावधीत झालेले नाही अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे, असे रायगड विभाग डाकघर अधीक्षक सुनील थळकर यांनी कळविले आहे.

# महाबळेश्वरमध्ये पर्यटकांसह ट्रॅफिक जॅमचा टक्का वाढला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाचा टक्का घटल्याची कारणमिमांसा सुरू असताना त्याचा फायदा-तोटा कोणाला याबाबतचे विश्लेषणही प्रसारमाध्यमांवर केल जात आहे, मात्र थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर येथे पर्यटक आणि टॅफिक जॅमचा टक्का वाढल्याचे शनिवारपासून सोमवारपर्यंत दिसून आले आहे.

मतदान करण्यासंदर्भातील शासकीय आणि समाजमाध्यमांद्वारे करण्यात आवाहनानंतरही राज्यातील पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदानाची टक्केवारी घटल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणात मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवून महाबळेश्वर, माथेरान आणि अन्य थंड हवेच्या ठिकाणी पर्यटन करण्यास प्राधान्य दिल्याचे दिसून आले. मुंबई व अन्य भागातील पर्यटकांनी शनिवार ते सोमवार अशी मतदानाची सुट्टी धरून सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे महाबळेश्वर गिरीस्थान येथे प्रचंड गर्दी केलेली दिसून आली. यामुळे महाबळेश्वर आणि क्षेत्रमहाबळेश्वर या दोन्ही ठिकाणी पर्यटकांच्या चारचाकी वाहनांच्या रांगा आणि ठिकठिकाणी टॅफिक जॅम झाल्याचे दिसून आले.









महाबळेश्वरमधील विल्सन पॉईंट, लॉर्डविक पॉईंट, सावित्री पॉईंट, ऑर्थरसीट पॉईंट, मंकी पॉईंट तसेच क्षेत्र महाबळेश्वरमधील महाबळेश्वर मंदिर, अतिमहाबळेश्वर मंदिर आणि पंचगंगा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांसह महाबळेश्वर एसटी बसस्थानक, छत्रपती प्रतापसिंह वन उद्यान तसेच पंचायत समिती परिसरामध्ये चारचाकी वाहनांच्या रांगा मोठ्या प्रमाणात दिसून आल्या. वेण्णा लेक परिसरातील रस्ता खोदकामामुळे वाहतुकीची आणि पर्यटकांची कोंडी तासभर खोळंबा करणारी ठरली. क्षेत्र महाबळेश्वरच्या मंदिर परिसरातील हॉटेल्स आणि फनगेम्स तसेच शॉपमध्ये आणि महाबळेश्वर शहरामध्येदेखील पर्यटकांच्या गर्दीचा उच्चांक तीन दिवस दिसून आल्याने गर्दीचे नियोजन करताना वनविभागाचे कर्मचारी, महाबळेश्वर गिरीस्थान प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर वसूली कंत्राटी कर्मचारी तसेच वाहतूक पोलीस व पोलीस कर्मचाऱ्यांच्या शिस्तीच्या पावती विनापावती प्रयत्नांमुळेदेखील वाहनांच्या रांगा ठिकठिकाणी उभ्या राहिल्या. त्यामुळे पर्यटकांना मनस्ताप व भूर्दंड सोसावा लागत असल्याचे सार्वत्रिक दृश्य दिसून आले.

सकाळी आठ वाजल्यापासून महाबळेश्वरला वाहनांची दाटी आंबेनळी घाटातून तसेच पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाद्वारे येणाऱ्या वाहनांमुळे वाढू लागली आणि महाबळेश्वरच्या गारव्याने दिवसभर पळ काढल्याने ट्रॅफिक जॅममध्ये टेरिफ कार्ड घेऊन अनेक सेल्समन खोळंब्याने हैराण झालेल्या पर्यटकांना लॉजिंग, रूम्स आणि हॉटेल्ससाठी आकर्षित करीत असल्याचे पाहण्यास मिळत होते. प्रत्येक मतदानाच्या सुटीवेळी महाबळेश्वरमध्ये पर्यटकांचा आणि ट्रॅफिक जॅमचा टक्का वाढत असल्याचे स्थानिक व्यावसायिकांनी सांगितल्यानंतर निरूत्साही मतदारांचा उत्साह सुटीचा आनंद उपभोगण्यासाठीच द्विगुणित होत असल्याचे या वेळी स्पष्ट झाले.

# सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थिनींकरिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह अलिबाग आरसीएफ गेटसमोर दिव्या अपार्टमेंट येथे कार्यरत आहे. येथे मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

या वसतिगृहामध्ये इयत्ता आठवीपासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती तीन टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती पाच टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्र्यरेषेखालील कुटूबांतील विद्यार्थीनी पाच टक्के, विशेषमागास प्रवर्ग दोन टक्के, अनाथ दोन टक्के, अपंग तीन टक्के यांना गुणवत्तेनसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थिनीकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा-दररोज पोहे, शिरा, उपीट इत्यादीपैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दूध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी/उसळ, लोणचे पापड इ.सह आठवड्यातून दोन वेळा मांसाहार) देण्यात येते.

अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामूल्य पुरविले जाते तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा ६०० रुपये निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेश पात्र महा. विद्यार्थिनींना दोन संचाकरिता गणवेश भत्ता/रेनकोट/छत्री भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त रेनकोट, छत्री भत्ता, संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रीडा साहित्य,मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

प्रवेशपात्र विद्यार्थिनींच्या पालकांचे सर्व मार्गानी मिळून वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विद्यार्थिनींकरिता दोन लाख ५० हजारांच्या आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष विद्यार्थिनींकरिता एक लाखांच्या आत असावे. ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत तहसिलदार यांच्या सहीचा सन २०२३-२४मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, आधारकार्ड, शाळा/कॉलेजचे बोनाफाईड, रेशनकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत. प्रवेश अर्ज वसतिगृहात उपलब्ध आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, अलिबाग येथे ८७६७३३९९७४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल यु.एस. गुजेला यांनी केले आहे.

# सांगडेमध्ये उद्या संयुक्त जयंती महोत्सव

**पाली : प्रतिनिधी**

रोह्यातील तक्षशिला बौद्ध विकास संघ, सांगडे यांच्या वतीने तथागत बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन गुरुवारी (दि. २३) करण्यात आले आहे. या वेळी विविध कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमाला आमदार अनिकेत तटकरे, तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष घनश्याम कराळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता जयंती महोत्सवचे अध्यक्ष यशवंत शिंदे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करून करण्यात येणार असून भंते विशुद्ध बोधी यांच्या वतीने बुद्धपूजा पाठ व धम्मदेसना होईल. याशिवाय दुपारचे स्नेहभोजन झाल्यानंतर संध्याकाळी ६ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत, संविधान अभ्यासक प्रा. सुनील देवरे आणि मॅक्स महाराष्ट्र चॅनल व महापरिवर्तनवादी पत्रकार संघाचे अध्यक्ष धम्मशिल सावंत उपस्थित राहणार आहेत. जाहीर सभा झाल्यानंतर रात्री प्रबोधनकारी व मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून बुध्द भीम गीतांवर आधारित अमित पाटील प्रस्तुत 'रंग माझ्या महाराष्ट्राचा' या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला मालसई ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व कार्यकारिणी, बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत व बौद्ध युवा संघाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तक्षशिला नगर सांगडे या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत.

# बुद्ध जयंती, शंकराचार्य पुण्यतिथी महोत्सव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महर्षि विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळातर्फे बुध्द पौर्णिमा व आद्य शंकराचार्य पुण्यतिथी निमित्त ८०व्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग तालुक्यातील केतकीचा मळा येथील सिद्धाश्रमात गुरुवारी (दि. २३) हा महोत्सव होईल.

या महोत्सवात वंदना जोशी (अलिबाग) यांचे डॉ. संप्रसाद विनोद यांनी प्रास्तावित केलेली आत्मबोध साधना तोंडओळख व प्रत्यक्ष अनुभव आणि लक्ष्मीकांत देशमुख यांचा गौतम बुद्धांचा संदेश असा विशेष कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता होणार आहे. महर्षि विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते व ॲड. अदिती वैद्य यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमांसाठी सर्वांना निमंत्रण देण्यात आले आहे.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेशाची संधी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत इयत्ता पहिली मध्ये प्रवेश देण्यात येणार आहेत. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज १० जूनपूर्वी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण येथे सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा, पालकाने विद्यार्थ्यांच्या नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी. यासाठी मुलाच्या पालकाच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा एक लाख रुपये इतकी असावी. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याचे वय सहा वर्षे पूर्ण असावे. वय ३१ डिसेंबर २०२४ रोजी सहा वर्षे पूर्ण आवश्यक व त्याचा जन्म १ जुलै २०१७ ते ३१ डिसेंबर २०१८ दरम्यान झालेला असावा. अर्जासोबत दोन पासपोर्ट फोटो आणि जन्मतारखेचा पुरावा म्हणून ग्रामसेवकाचा जन्माचा दाखला तसेच अर्जासोबत विद्यार्थ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडण्यात यावे. आधारकार्डची झेरॉक्स जोडण्यात यावी.

विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निमशासकीय नोकरदार नसावेत. खोटी माहिती सादर केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. दरम्यान, निवड केलेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्चिती झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पालकांच्या अथवा पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही.

# आज एलिमिनेटर सामना

## बंगळुरू आणि राजस्थान आमनेसामने



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएलमध्ये प्ले ऑफसाठी पात्र ठरलेल्या चार संघाचे गुणतालिकेतील स्थान निश्चित झाले. दरवर्षीप्रमाणे प्ले ऑफसमध्ये एकूण चार सामने खेळवले जाणार आहेत. यापैकी एलिमिनेटर सामना बुधवारी (दि. २२) रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळवला जाणार आहे.

एलिमिनेटर सामन्यात जो संघ हरेल, त्याचा या आयपीएलमधील प्रवास संपणार आहे. यानंतर एलिमिनेटरचा विजेता संघ आणि क्वालिफायर-१मधील पराभूत संघ क्वालिफायर-२मध्ये आमनेसामने येतील. या सामन्यातील विजेता संघ क्वालिफायर-१मधील विजेत्याशी फायनलमध्ये भिडेल. हा अंतिम सामना २६ मे रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर सामना खेळवला जाणार आहे.

यंदाच्या आयपीएलवर पावसाचे संकट निर्माण झाले आहे. या हंगामात आतापर्यंत एकूण तीन सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. अशा स्थितीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील एलिमिनेटर सामन्याआधीच कोट्यवधी चाहत्यांच्या मनात एक प्रश्न उपस्थित होत आहे की, हा सामनाही पावसामुळे रद्द झाला, तर ट्रॉफीच्या या शर्यतीत कोण राहणार आणि कोण? या शर्यतीतून बाहेर पडणार?

आरसीबी आणि आरआर यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यास हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल. राखीव दिवशीही हवामान सहकार्य करीत नाही असे मानल्यास पंच किमान ५-५ षटकांचा सामना आयोजित करण्याचा प्रयत्न करतील. हेही शक्य नसेल तर सुपर ओव्हर घेण्यात येईल, मात्र सुपर ओव्हर्सचा पण सामना खेळला गेला नाही, तर कोणता संघ क्वालिफायर खेळणार हे पॉइंट टेबलवर ठरवले जाईल. गुणतालिकेत दोन्हीपैकी जो संघ अव्वल स्थानावर राहिला होता, तो संघ दुसरा क्वालिफायर खेळण्यासाठी पात्र ठरेल. त्याचबरोबर दुसरा संघ बाहेर पडेल. या नियमामुळे आरसीबीला मोठा फटका बसणार आहे. जर सामना रद्द झाला, तर आरसीबी संघ बाहेर पडेल आणि राजस्थान रॉयल्स पुढच्या फेरीत म्हणजे दुसरा क्वालिफायर सामना खेळेल.

### पाऊस पडल्यास राखीव दिवशी लढत

गेल्या आयपीएल हंगामापर्यंत प्ले ऑफ सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस नव्हता. तो फक्त आयपीएलच्या अंतिम सामन्यासाठी ठेवण्यात आला होता, पण या हंगामापासून एलिमिनेटर सामना आणि क्वालिफायर सामन्यांसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आले आहेत आहे. अशा परिस्थितीत आरसीबी आणि आरआर यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यास हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल.

# सुपर लीग क्रिकेट स्पर्धेसाठी रायगडच्या तीन मुलींची निवड

**नेरळ : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील तीन मुलींची महाराष्ट्राच्या सुपर लीग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या तिघांपैकी दोन मुली कोल्हापूर येथे, तर एक मुलगी जळगाव येथे खेळण्यासाठी जाणार आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने नुकतीच पुणे येथे १९ वर्षाखालील मुलींची आमंत्रित लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आली होती. यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून संघ पाठवण्यात आला होता. या वेळी तीनपैकी दोन सामन्यांत रायगडच्या संघाने विजय मिळविला, तर एक सामन्यात पराभव पत्करला. रायगडकडून गोलंदाजीत वेगवान बॉलर अंजली गोडसे (पनवेल) हिने, स्पिनर म्हणून समिधा तांडेल (खोपोली) आणि अष्टपैलू म्हणून रोशनी पारधी (महाड) हिने चांगली कामगिरी केली. त्यामुळे या तिघींची सुपर लीगसाठी निवड झाली आहे. यातील रोशनी व समिधा या कोल्हापूर येथे, तर अंजली गोडसे ही जळगाव येथे सुपर लीग स्पर्धा खेळण्यासाठी २३ मे रोजी जाणार आहे.



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून जिल्ह्यात मुलींच्या क्रिकेटसाठी गेल्या तीन वर्षांपासून सुरुवात करण्यात आली आहे. असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, संदीप पाटील आणि प्रशिक्षक तथा संघ व्यवस्थापक मनीषा अडबल खूप मेहनत घेत आहेत. त्यांनी तिन्ही खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# जर्मनीचा लेक्झँडर झ्वेरेव इटालियन ओपनचा विजेता

**रोम : वृत्तसंस्था**

जर्मनीच्या लेक्झँडर झ्वेरेव याने इटालियन ओपन स्पर्धेत अजिंक्यपदावर नाव कोरले. त्याने अजिंक्यपदाच्या लढतीत २४व्या स्थानावर असलेल्या निकोलस जॅरी याच्यावर सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवत झळाळता करंडक पटकावला.

लेक्झँडर झ्वेरेव याला दोन वर्षांपूर्वी दुखापतीला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर या पठ्ठ्याला टेनिस कोर्टवर दमदार प्रदर्शनही करता आले नाही. इटालियन ओपनचे जेतेपद त्याच्यासाठी स्पेशल ठरले आहे. आता आगामी फ्रेंच ओपन या ग्रँडस्लॅमआधी त्याचा आत्मविश्वास कमालीचा उंचावला असेल.

फ्रेंच ओपन स्पर्धेसाठीच्या प्रबळ दावेदार टेनिसपटूंच्या यादीत आता त्याचाही समावेश असणार आहे. नोवाक जोकोविच व राफेल नदाल या महान खेळाडूंना सुमार फॉर्ममधून जावे लागत आहे. तसेच यानिक सिन्नर व कार्लोस अल्काराझ या युवा टेनिसपटूंनाही दुखापतींनी घेरले आहे. त्यामुळे झ्वेरेव याच्याकडे फ्रेंच ओपन स्पर्धेमध्ये अजिंक्यपद पटकावण्याची सुवर्णसंधी असणार आहे.

दरम्यान, याआधी महिला एकेरीची अंतिम लढत पार पडली. यामध्ये इगा स्विअतेक हिने एरीना सबलेंका हिला पराभूत करीत विजेतेपदाचा मान संपादन केला होता.

# जेक फ्रेसर मॅकगर्कला ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघात स्थान

## पर्यायी खेळाडू म्हणून संधी



**सिडनी : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या यंदाच्या मोसमात दिल्ली कॅपिटल्स संघासाठी मोलाची कामगिरी करणारा युवा फलंदाज जेक फ्रेसर मॅकगर्क याला ऑस्ट्रेलियाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठीच्या संघात स्थान मिळले आहे. मॅकगर्क याला पर्यायी खेळाडू म्हणून संघात स्थान देण्यात आले आहे.


वेस्ट इंडिज व अमेरिकेत १ जूनपासून टी-२० विश्वकरंडकाला सुरुवात होणार आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेट निवड समितीचे प्रमुख जॉर्ज बेली यांनी टी-२० संघाची निवड केली तेव्हा पर्यायी खेळाडू म्हणून एकालाच विश्वकरंडकाला पाठवण्यात यावे असे सुचवले होते, पण मॅकगर्क याची आयपीएलमधील फलंदाजी बघितल्यानंतर मॅथ्यू शॉर्ट याच्यासह मॅकगर्क याचीही निवड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आयपीएलमधील प्ले-ऑफचा थरार मंगळवारपासून आहे. यादरम्यान ट्रॅव्हिस हेड, पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, ग्लेन मॅक्सवेल व कॅमेरुन ग्रीन हे ऑस्ट्रेलियन खेळाडू आयपीएलमधील विविध संघांचे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यामुळे या आठवड्यात हे खेळाडू ऑस्ट्रेलियन संघाशी जोडले जाणार नाहीत.

ऑस्ट्रेलियाच्या काही खेळाडूंनी टी-२० विश्वकरंडकाच्या सरावाला सुरुवात केली आहे. मिचेल मार्श, जॉश हॅझलवूड, जॉश इंग्लिस, डम झॅम्पा व श्टन गर या खेळाडूंनी सराव केला आहे. मिचेल मार्श दुखापतीमधून सावरत आहे. त्यामुळे त्याने सध्या तरी गोलंदाजी केलेली नाही.

ऑस्ट्रेलियन संघ गुरुवारी टी-२० विश्वचषकासाठी वेस्ट इंडिजला रवाना होणार आहे. ऑस्ट्रेलियन संघाला नामिबिया व यजमान विंडीजविरुद्ध सराव सामना खेळावयाचा आहे. ऑस्ट्रेलियाचा विश्वकरंडकातील सलामीचा सामना ५ जूनला ओमानविरुद्ध होणार आहे.

# महेंद्रसिंह धोनी पुढील आयपीएलही खेळण्याची शक्यता -अंबाती रायडू



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धचा आयपीएल सामना हा महेंद्रसिंह धोनीच्या कारकीर्दीतील अखेरचा सामना होता असे मला वाटत नाही. तो पुढील हंगामातही खेळण्याची शक्यता कायम आहे, मात्र त्यासाठी बीसीसीआयने प्रभावी खेळाडूचा (इम्पॅक्ट प्लेयर) नियम कायम ठेवणेही गरजेचे आहे, असे मत धोनीचा चेन्नई सुपर किंग्ज संघातील माजी सहकारी आणि भारताचा माजी क्रिकेटपटू अंबाती रायडू याने व्यक्त केले.

'धोनीचा हा अखेरचा सामना होता असे मला वाटत नाही. त्याला अशा प्रकारे निरोप देणे आवडणार नाही,' असे रायडू म्हणाला. चेन्नईच्या संघाला बंगळुरूविरुद्ध निणार्यक सामन्यात पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्यांचे आव्हान संपुष्टात आले. 'धोनी बाद झाल्यानंतर रागावलेला दिसला. हे धोनीच्या स्वभावाच्या अगदी विपरीत होते. चेन्नईच्या संघाला प्ले ऑफमध्ये प्रवेश मिळवून देत पुढे विजयी निरोप देण्याची धोनीची इच्छा होती, मात्र ती पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे तो पुढील हंगामात खेळण्याची शक्यता कायम आहे. प्रभावी खेळाडूच्या नियमामुळे चेन्नईला अतिरिक्त फलंदाज खेळवता येत आहे. बीसीसीआयने प्रभावी खेळाडूचा नियम पुढील हंगामातही कायम राखला पाहिजे,' असेही रायडू म्हणाला.

# 'केकेआर'मुळे रोहित शर्मा आणि स्टार स्पोर्ट्समध्ये जुंपली

## हिटमॅनचे आरोप वाहिनीने फेटाळले






**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्मा आणि स्टार स्पोर्ट्स वाहिनीचे प्रकरण आता वेगळ्या पातळीवर पोहचताना दिसत आहे. रोहितने काही दिवसांपूर्वी आरोप केला होता की, त्याचे वैयक्तिक संभाषणदेखील टीआरपीसाठी प्रसारित केले गेले होते, मात्र आता स्टार स्पोर्ट्सने मुंबई इंडियन्सच्या माजी कर्णधाराला प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी एक निवेदन जारी केले असून त्यात रोहितचे आरोप स्पष्टपणे फेटाळले आहेत.

रोहित शर्माला उत्तर देताना स्टार स्पोर्ट्सने सांगितले की, रोहित शर्माच्या संभाषणाची क्लिप १६ मे वानखेडे स्टेडियममधील आहे, जी प्रसारित करण्याचे अधिकार स्टार स्पोर्ट्सकडे होते. त्या व्हिडीओमध्ये रोहित त्याच्या मित्रांसोबत बोलत होता. आम्ही त्या क्लिपचा कोणताही ऑडिओ किंवा संभाषण रेकॉर्ड किंवा प्रसारित केले नाही. तो व्हिडिओ फक्त प्री-शोसाठी वापरला होता, पण त्यात ऑडिओ रेकॉर्ड नव्हता.

रोहित शर्माचा व्हिडिओ आणि ऑडिओ कोलकाता नाईट रायडर्सने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केला होता. त्या व्हिडीओवरून झालेल्या वादानंतर केकेआरने तो सोशल मीडियावरून हटवला. या ऑडिओमुळे रोहित शर्माला खूप त्रास झाला आणि त्यामुळेच त्याने सोशल मीडियावर थेट स्टार स्पोर्ट्सवर मोठे आरोप केले, मात्र चॅनलने स्पष्टपणे म्हटले आहे की ते खेळाडूंच्या गोपनीयतेचा आदर करतात.

रोहितने सोशल मीडियावर पोस्ट करताना लिहिले होते की, खेळाडूंच्या आयुष्यातल्या खासगी गोष्टी जाहीर केल्या जात आहेत. कॅमेरे तुमचे प्रत्येक बोलणे, हावभाव, कृती टिपत आहेत. तुम्ही मित्रांबरोबर, घरच्यांबरोबर, संघातील सहकाऱ्यांबरोबर, सरावावेळी जे जे बोलता ते सगळे टिपले जात आहे. मी बोलत असताना रेकॉर्ड करू नका अशी विनंती करुनही स्टार स्पोर्ट्सने चित्रीकरण केले. नुसते चित्रीकरण करून थांबले नाहीत तर ते प्रसारितही केले. हा गोपनीयतेचा भंग आहे. त्याने पुढे लिहिले की, 'त्यांना एक्सक्लुसिव्ह कंटेंट हवा आहे. व्ह्यूज हवे आहेत, एंगजेमेंट हवी आहे, पण या सगळ्याच्या नादात तुम्ही चाहते, खेळाडू आणि क्रिकेट यांच्यातील विश्वासाला तडा घालवत आहात.

# टी-२० वर्ल्डकपसाठी निवड झालेल्या शिवम दुबेचा धावांसाठी संघर्ष

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकपसाठी प्रत्येक खेळाडूला आपली निवड व्हावी म्हणून झटताना पाहिले गेले होते, पण आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्जच्या एका खेळाडूने आपल्या खराब खेळीतून संघच गोत्यात आणला. तसाच प्रकार टीम इंडियासोबतही होईल का अशी धाकधूक चाहत्यांमध्ये लागून राहिली आहे. हा खेळाडू आहे शिवम दुबे.

बीसीसीआयच्या सिलेक्टर्सनी दुबे फुल फॉर्ममध्ये आहे हे पाहून त्याची संघात निवड केली, पण त्यानंतर त्याने असे काही खेळण्यास सुरुवात केली की बॅटला बॉल लागणे कठीण होऊन बसले आहे. दुबे आता क्रीझवर जोरदार फटके खेळण्यासाठी संघर्ष करीत आहे. हे भारतीय संघासाठी चांगले संकेत नाहीत.

भारतीय संघाची घोषणा होण्यापूर्वी शिवम दुबेने १७२च्या स्ट्राईक रेटने ५८च्या सरासरीने रन्स काढले होते, मात्र परंतु निवड झाल्यावर दुबेने ९.२च्या सरासरीने रन्स काढले आहेत. त्याचा स्ट्राईक रेट ११२ राहिला आहे.

चेन्नईसाठी महत्त्वाच्या असलेल्या सामन्यात दुबेने १५ चेंडूंमध्ये अवघ्या सात धावा काढल्या. एवढे चेंडू खेळूनही दुबे चाचपडत होता. त्याने यंदाच्या आयपीएलमध्ये तीन अर्धशतक ठोकली असून १४ सामन्यांत ३९६ धावा केल्या आहेत. आता मात्र तो चाचपडताना दिसत आहे.

# 'आरसीबी'कडून खेळण्यापेक्षा सामना पाहणे खूप कठीण -स्मृती मानधना




**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामात एकेकाळी स्पर्धेबाहेर होण्याची टांगती तलवार असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने असामान्य कामगिरी केली. प्ले ऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर झालेल्या आरसीबीने चेन्नईला पराभूत करून प्ले ऑफचे तिकीट मिळवले. महिला प्रीमिअर लीगमध्ये आरसीबीची कर्णधार असलेल्या स्मृती मानधनाने आरसीबीच्या विजयानंतर आनंद व्यक्त केला.

यंदा आयपीएलच्या प्ले ऑफसाठी पात्र ठरणारा आरसीबी हा चौथा संघ ठरला. आरसीबीने अखेरचे सलग सहा सामने जिंकून टॉप-४मध्ये प्रवेश केला. खरेतर पहिल्या सात सामन्यांनंतर आरसीबीला प्ले ऑफमध्ये पोहचण्याची फक्त एक टक्के आशा उरली होती. चेन्नई आणि बंगळुरू हा सामना पाहण्यासाठी आरसीबीच्या महिला शिलेदारांनी हजेरी लावली होती.

स्मृती मानधना, रिचा घोष, श्रेयांका पाटील आणि आशा सोभना या आरसीबीच्या महिला संघाच्या खेळाडू चिन्नस्वामी स्टेडियमवर उपस्थित होत्या. दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणारी जेमिमा रॉड्रिग्जदेखील दिसली. आरसीबीच्या पॉडकास्टवर बोलताना स्मृती म्हणाली की, आरसीबीकडून खेळण्यापेक्षा त्यांना खेळताना पाहणे खूप कठीण आहे, कारण सामना पाहताना खूप तणाव असतो. आमच्या पुरुष संघाने ज्या प्रकारे कमबॅक केले आणि जी टक्कर दिली ते पाहून आनंद वाटला. त्यांनी केलेली कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. आम्ही सर्वांनी एकत्र सामना पाहिला यामुळे आनंद द्विगुणित झाला.

भारतीय महिला संघाची आघाडीची फलंदाज आणि दिल्ली कॅपिटल्सची शिलेदार जेमिमा रॉड्रिग्ज म्हणाली की, विराट कोहली आणि महेंद्रसिंह धोनी यांना एकत्र खेळताना पाहणे ही एक आनंदाची बाब आहे. धोनी पुढच्या हंगामात खेळताना दिसेल की नाही याबाबत कल्पना नाही, पण चिन्नस्वामी स्टेडियमवर एकवटणारे चाहते इतर कुठे पहायला मिळतील असे वाटत नाही.

दरम्यान, आरसीबी स्पर्धेबाहेर झाले असे वाटत असताना फाफ डुप्लेसिसच्या नेतृत्वातील संघाने कमाल केली. पहिल्या सात सामन्यांनंतर आरसीबीला प्ले ऑफमध्ये पोहचण्याची फक्त एक टक्के आशा उरली होती, पण नंतरच्या काही सामन्यांमध्ये संघाने असामान्य कामगिरी केली. विराट कोहली, विल जॅक्स, यश दयाल, दिनेश कार्तिक आणि स्वप्नील सिंग या शिलेदारांनी आरसीबीसाठी चमक दाखवली. त्यांचा सामना आता एलिमिनेटर सामन्यात बुधवारी राजस्थान रॉयल्सशी होईल.

# अष्टगंधा क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धा उत्साहात

## राजपूत टायटन्स संघ विजेता

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स सेक्टर ४८ येथे अष्टगंधा क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेत राजपूत टायटन संघाने विजेतेपद पटकाविले, तर सोलापूर वॉरियर्स संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेत नवी मुंबईतील पाच संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक भरत जाधव यांनी नाणेफेक करून केली. दोन दिवस रंगलेल्या स्पर्धेत राजपूत टायटन संघाने बाजी मारली. स्पर्धेत प्रदीप पाटील उत्कृष्ट फलंदाज, तर विशाल चंदनशिवे उत्कृष्ट गोलंदाज ठरला.

विजेत्या संघास भाजप युवा नेते आदित्य जाधव यांच्या हस्ते चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गणेश कोनार, रणजित निंबाळकर यांनी मेहनत घेतली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com